आपत्ती कधी सांगून येत नाही. रायगड जिल्हा हा नेहमीच आपत्तीच्या केंद्रस्थानी असणारा जिल्हा आहे. विशेष म्हणजे, पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात येथील प्रशासनासह नागरिकांना आपत्तीचा सामना करावा लागतो. यावर उपाययोजना करण्यासाठी रायगडच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाने मागणीचा प्रस्ताव सरकारला पाठवला आहे. त्यामाध्यमातून नऊ तालुक्यातील ४९ गावांत आपत्ती उपाययोजनांच्या ६२ कामांसाठी तब्बल ११० कोटी ७२ लाख ६५ हजार रुपयांच्या निधीची आवश्यकता आहे. सरकारने तातडीने निधी वर्ग केल्यास कामांना सुरुवात करुन निर्धारीत वेळेत कामे पूर्ण होतील. त्यामुळे आगामी कालावधीत येणाऱ्या आपत्तींना रोखता येऊ शकते, असा दावा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाचा आहे.

आपत्ती शब्द रायगडकरांसाठी काही नवीन नाही. रायगडकरांनी याआधी अशा बऱ्याच आपत्तींचा मुकाबला केला आहे. त्यामध्ये शेकाडो माणसं मृत्युमुखी पडली आहेत. अनेकांनी पालक गमावले, तर अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत. महाड, म्हसळा, श्रीवर्धन, पोलादपूर, माणगाव, तळा, अलिबाग, कर्जत हे तालुके आपत्तीच्या केंद्रस्थानी आहेत. खालापूर तालुक्यातील इर्शाळवाडी असो अथवा महाड तालुक्यातील तळिये येथे दरड कोसळून झालेली दुर्घटना असो. यातून सरकार धडा घेणार आहे की नाही, असा सवाल उपस्थित होतो.



| तालुका | गावांची संख्या | कामांची संख्या | रक्कम |
|---|---|---|---|
| महाड | १८ | १८ | ६० कोटी ९७ लाख |
| म्हसळा | २ | २ | ५ कोटी ३६ लाख |
| श्रीवर्धन | १ | ० | ५ कोटी ६३ लाख |
| पोलादपूर | ५ | ५ | ४ कोटी ९३ लाख |
| माणगाव | २ | २ | १ कोटी ८४ लाख |
| तळा | ३ | ३ | १० कोटी ४९ लाख ९८ हजार |
| अलिबाग | १३ | २९ | २ कोटी ९६ लाख |
| कर्जत | १८ | १८ | १८ कोटी५१ लाख २४ हजार |
| एकूण | ६२ | ७७ | ११० कोटी ७२ लाख ६५ हजार |

> रायगड जिल्ह्यात सातत्याने येणाऱ्या आपत्तीचा मुकाबला करण्यासाठी सातत्याने उपाययोजना करण्यात येत आहेत. दरडप्रवण क्षेत्रातील काही गावांमध्ये दगड, माती हटवणे, संरक्षक भिंत बांधणे, नैसर्गिक पाण्याचे प्रवाह सुस्थितीत करणे यासह अन्य कामे होणे गरजेचे आहे. यासंबंधीच्या निधी मागणीचा प्रस्ताव सरकारला पाठवला आहे. निधी प्राप्त झाल्यानंतर कामाला सुरुवात करण्यात येणार आहे.
>
> – सागर पाठक, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, रायगड

डोंगर कड्यावरून दरड किंवा खडक कोसळणं, जमीन खचणे अशा घटनांना आपण भूस्खलन म्हणतो. याचा वेग इतका असतो की त्याच्या प्रवाहात येणाऱ्या कोणत्याही वस्तू किंवा जीवाला आपल्यासोबत घेऊन जातं. भूस्खलनाचा अंदाज लावणं हे सहज शक्य नसतं. त्यामुळेच त्यावर तात्काळ उपाययोजना शक्य होत नाही. भूस्खलनाचे वहन, स्खलन, डोंगरकड्यावरून खडक कोसळणं असे अनेक प्रकार असतात. पश्चिम घाट जैवविविधता तज्ज्ञ समितीचा अहवाल सरकारला सादर करून काळ लोटला; पान ७ वर

## प्रारूप विकास आराखड्याला दोन हजारांवर हरकती

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।





- सर्वात जास्त हरकती नो डेव्हलपमेंट झोनविरोधात

पनेवल पालिकेकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या प्रारूप विकास आराखड्यावर हरकती आणि सूचना नोंदविण्यासाठी एका महिन्याची देण्यात आलेली मुदत ७ सप्टेंबर रोजी संपली आहे. या मुदतीत नगर रचना विभागाकडे दोन हजारांपेक्षा जास्त हरकती नोंदवण्यात आल्या असल्याची माहिती नगर रचना विभागाकडून देण्यात आली असून, सर्वात जास्त हरकती पालिकेने नो डेव्हलपमेंट झोन म्हणून जाहीर केलेल्या भागातून नोंदवण्यात आल्या आहेत.

२०१६ साली पनवेल नगरपरिषदेचा विस्तार करुन पनवेल पालिकेची स्थापना करण्यात आली. यामध्ये पनवेल शहरासोबत सिडकोने वसवलेल्या नवीन पनवेल, खांदेश्वर, कळंबोली, कामोठे, खारघर, तळोजा, नावडे, काळुंद्रे या वसाहतींसह २९ गावांचा समावेश करण्यात आल्याने २९ गावांमधील शेतजमिनींचे नियोजनाचे अधिकार पालिकेला मिळाले. पालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २६ (१) प्रमाणे पनवेल महानगरपालिका क्षेत्रासाठी सुधारित व एकत्रित प्रारूप विकास योजनेचा आराखडा बनविण्याचे काम हाती घेतले. तत्कालिन आयुक्त गणेश देशमुख यांनी हा आराखडा बनविण्यासाठी प्रशासकीय स्तरावर सातत्याने पाठपुरावा केला होता. विद्यमान पालिका पान ७ वर

### आजचा अग्रलेख

पंगुं लंघयते गिरीम्

### वेधक

## लाडक्या बहिणीसाठी सरकारची धावाधाव

**नवी दिल्ली :** पुण्यातील पाषाण भागात असलेली हौसाबाई बहिरट यांच्या मालकीची २४ एकर ३८ गुंठे जमीन राज्य सरकारने संरक्षण विभागाला दिली होती. हौसाबाईंनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतल्यानंतर न्यायालयाने सरकारला खडसावत लाडकी बहीण योजना थांबवा, असा इशारा दिला होता. त्यानंतर सरकारला जाग आली होती. याप्रकरणी सोमवारी सुनावणी झाली. राज्य सरकारने न्यायालयात हमीपत्र दाखल केलं असून, येवलेवाडी पुणे येथील २४ एकर ३८ गुंठे एवढी जमीन राज्य सरकार देण्यास तयार आहे. याचिकाकर्त्यांनी ही जमीन स्वीकारण्यास सहमती दर्शवली असून, सरकार लवकरात लवकर अर्जदाराला जमीन सुपूर्द करेल, अशा आशयाचे हमीपत्र सरकारकडून न्यायालयात दाखल करण्यात आलेले आहे. सुनावणीदरम्यान पान ७ वर

## तिहेरी हत्याकांडातील आरोपीचा शोध अद्याप सुरूच



- पोलिसांचे कसब पणाला
- अखेर ‘त्या’ तिघांवर केले अंतिम संस्कार

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील चिकनपाडा येथील पोशीरपाडा येथील तिहेरी हत्याकांडाला दीड दिवस उलटला आहे. मात्र, त्या तिहेरी हत्याकांडाच्या आरोपीपर्यंत पोलीस अद्याप पोहोचले नाहीत. दरम्यान, मुंबई येथील जे जे रुग्णालयात शवविच्छेदन करून आणलेल्या तिन्ही मृतदेहांवर बोरगाव येथे अंतिम संस्कार करण्यात आले आहेत.

**नातेवाईकांचा टाहो**

**बोरगाव येथील पाटील कुटुंबाने आरोपीला अटक होत नाही, तोवर मृतदेह ताब्यात घेऊन अंतिम संस्कार केले जाणार नाहीत, अशी भूमिका सुरुवातीला घेतली होती. तर, माले ग्रामस्थांनी आशा सेविका असलेल्या आपल्या बहिणीसह तिचे पती आणि भाचा यांच्यावर पोशीर पाडा येथेच अंतिम संस्कार व्हावेत, अशी भूमिका घेतली होती. मात्र, पोलिसांनी मध्यस्थी करीत यशस्वी मार्ग काढला.**

चिकनपाडा गावाच्या हद्दीतील पोशीरपाडा या भागातील मदन जैतू पाटील, अनिशा मदन पाटील आणि विवेक मदन पाटील यांचा खून झाला असल्याचे रविवारी सकाळी निष्पन्न झाले होते. बोरगाव येथील मूळ रहिवासी असलेले मदन पाटील आणि त्याचा भाऊ हनुमंत पाटील हे गेली १५ वर्षे चिकनपाडा गावाच्या हद्दीतील पोशीरपाडा येथे घर बांधून राहात आहेत. रविवारी (दि. ८) रोजी सकाळी दहा वाजण्याच्या पान ७ वर

## मच्छिमारांना दीड कोटींचा गंडा

। अलिबाग । प्रतिनिधी ।

उदारीवर मासळी घेऊन अलिबागमधील चार मच्छिमारांना एका व्यापाऱ्याने सुमारे दीड कोटी रुपयांचा गंडा घातला आहे. याप्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेने जिल्ह्यात उदारीवर मासळी घेऊन मच्छिमारांची फसवणूक करणाऱ्या व्यापाऱ्यांची टोळी सक्रीय झाल्याचे समोर आले आहे.

रायगड जिल्ह्यात अलिबागसह आक्षी, बोर्ली, नवगाव अशा अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात मासळीची करोडो रुपयांची उलाढाल होते. व्यापारी मोठ्या प्रमाणात मासळी मच्छिमारांकडून विकत पान ७ वर

> मच्छिमारांची फसवणूक झाल्याची चार जणांनी लेखी तक्रार केली होती. तक्रार अर्जावरून तपासाबरोबरच पडताळणी करून घेतल्यावर व्यापारी सोलकर याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. त्याचा शोध पोलीस घेत आहेत.
>
> – किशोर साळे, पोलीस निरीक्षक

## रितू कोळीची मृत्यूशी झुंज अपयशी

। उरण । वार्ताहर ।



उरण तालुक्यात अपघाताच्या घटनांचे सत्रच सुरु आहे. ऐन गणेशोत्सव सणासुदीच्या काळात जड वाहनांमुळे होणाऱ्या या अपघातांमुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. रविवार, दि. ८ सप्टेंबर रोजी सकाळी साडे ११ वाजण्याच्या सुमारास उरण शहरातील चार फाटा ते करंजादरम्यान असलेल्या द्रोणागिरी हॉटेल समोरील रोडवर भीषण अपघात झाला. या अपघातात करंजा गावातील रितू कोळी या तरुणीचा बळी पान ७ वर

### स्व. मीनाक्षी पाटील यांच्या जयंतीनिमित्त

## पेझारीमध्ये वक्तृत्व स्पर्धा

। अलिबाग । प्रतिनिधी ।



शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्या, माजी राज्यमंत्री स्व. मीनाक्षी पाटील यांच्या ७७ व्या जयंतीनिमित्त अलिबागमध्ये वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. पेझारी येथे ही स्पर्धा शुक्रवारी (दि.१३) सकाळी नऊ वाजता होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

माजी राज्यमंत्री मीनाक्षी पाटील यांनी राजकीय, सामाजिक क्षेत्रात आपल्या वक्तृत्वाच्या जोरावर एक वेगळी छाप टाकली. जिल्हा परिषदेपासून विधानसभेच्या सभागृहामध्ये सर्वसामान्यांचे प्रश्न मांडून ते सोडविण्यास प्रशासनासह शासनाला भाग पाडण्यामध्ये त्यांचा हातखंडा राहिला आहे. सर्वच क्षेत्रातील दांडगा अभ्यास असलेल्या मीनाक्षी पाटील एक चांगल्या वक्त्या होत्या.

स्व. मीनाक्षी पाटील यांच्या जयंतीनिमित्त वक्तृत्व स्पर्धा आयोजित केली आहे. तीन गटांमध्ये ही स्पर्धा असणार आहे. पहिला गट सहा ते १२ वयोगटातील असून, या वयोगटासाठी बालपण ते राजकीय वाटचाल हे विषय आहेत. दुसरा गट १२ ते १८ वयोगटातील असून, त्यांच्यासाठी महाराष्ट्राची पान ७ वर

## लोकशाही दिनी चार अर्ज निकाली

। रायगड । प्रतिनिधी ।

कोकण विभागीय लोकशाही दिनात सोमवारी (दि. ९) चार अर्ज निकाली काढण्यात आले. सामान्य प्रशासनाचे उपायुक्त अमोल यादव यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या लोकशाही दिनात नागरिकांनी आपल्या तक्रारी मांडल्या. त्यांच्या समस्या जाणून प्रकरणे उचित कार्यवाहीसाठी संबंधित कार्यालयांकडे पाठविण्यात आली. यावेळी पान ७ वर





### समाज कल्याण विभागाकडून गतवर्षी २८ कामे मंजूर

# वस्ती सुधार योजनांची कामे अपूर्णच

प्रमोद जाधव

। अलिबाग ।

- फक्त ५५ टक्के कामे पूर्ण झाल्याची माहिती समोर
- अनुसूचित जाती, बौद्ध घटकांना विकासाची प्रतीक्षा

जिल्हा परिषद समाजकल्याण विभागामार्फत अनुसूचित जाती, नवबौद्ध घटकांतील वस्ती सुधार योजनेंतर्गत गतवर्षी २८ कामे मंजूर झाली. ही सर्व कामे अद्याप पूर्ण झाली नसल्याची माहिती समोर येत आहेत. फक्त ५५ टक्केच कामे पूर्ण करण्यास यंत्रणा यशस्वी ठरली आहे. त्यामुळे अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांना विकासाची प्रतीक्षा आजही कायम असल्याचे दिसून येत आहे.

रायगड जिल्ह्यातील अनुसूचित जाती, नवबौद्ध घटकांच्या विकासासाठी जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागामार्फत वेगवेगळ्या योजना राबविल्या जातात. वैयक्तिक योजनांसह सार्वजनिक योजना राबवून तेथील घटकांचा विकास साधण्याचा प्रयत्न जिल्हा परिषदेमार्फत केला जातो. शासनाच्या समाजकल्याण विभागामार्फत दरवर्षी अनुसूचित जाती, नवबौद्ध



समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी जिल्हा परिषदेला निधी वितरीत केला जातो. त्यासाठी दर पाच वर्षांचा बृहत आराखडा तयार केला जातो. २०२३-२४ या वर्षासाठी अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील वस्ती सुधार योजनेंतर्गत जिल्हा परिषद समाजकल्याण विभागाला दोन कोटी २५ लाख रुपयांचा निधी वितरीत करण्यात आला. जिल्हा परिषद समाजकल्याण विभागाकडे कामांचे प्रस्ताव पाठविण्यात आले. त्यामध्ये समाज मंदिर, वाड्या-वस्त्यांमधील गटार नियोजन, सभा मंडप तसेच रस्ते अशा अनेक कामांचा समावेश आहे. समाज मंदिर, सभा मंडपासह रस्ते अशा २८ कामांना मंजुरी देण्यात आली होती. यातील नव्वद टक्के निधी तालुका स्तरावर गटविकास अधिकाऱ्यांना वर्गदेखील करण्यात आला. परंतु, निधी वितरीत होऊनदेखील अद्यापपर्यंत फक्त ५५ टक्केच कामे पूर्ण झाल्याची माहिती जिल्हा परिषद विभागाकडून उपलब्ध झाली आहे. निधी उपलब्ध असताना मागासवर्गीय घटकांच्या विकासाची कामे अपूर्ण का, असा प्रश्न जनमानसातून उमटत आहे.

> अनुसूचित जाती, नवबौद्ध घटकातील वस्ती सुधार योजनेसाठी २८ प्रस्ताव मंजूर करण्यात आले असून, नव्वद टक्के निधी गटविकास अधिकारी यांना वर्ग केला आहे. अंदाजे ५० टक्क्यांहून अधिक कामे पूर्ण झाली आहेत. कामे शंभर टक्के पूर्ण झाली असल्यास शिल्लक दहा टक्के निधी वर्ग केला जाईल.
>
> – डॉ. शाम कदम, समाजकल्याण अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, समाजकल्याण विभाग

# पंगु लंघयते गिरीम्

प्रचंड जिद्द आणि कणखर मन असेल तर पायाने पांगळेही पर्वत चढून जाऊ शकतात. भारतीय क्रीडापटूंनी आपल्याला याचेच दर्शन घडवले आहे. अपंग क्रीडापटूंसाठीच्या पॅरालिम्पिक्स स्पर्धांमध्ये भारतीय चमूने मोठा पराक्रम केला आहे. पॅरिसमध्ये रविवारी संपलेल्या या स्पर्धांमध्ये सात सुवर्णपदकांसह तब्बल २९ पदके जिंकून आजवरची सर्वोच्च कामगिरी नोंदवली. या स्पर्धेत आपण २०१६पासून सहभागी होण्यास सुरुवात केली. पहिल्या वर्षी आपल्याला केवळ चार पदके मिळाली होती. त्यानंतर २०२० मध्ये टोकियो स्पर्धांमध्ये पाच सुवर्णासह एकूण १९ पदके मिळवली होती. आता या क्रीडापटूंनी आणखी मोठी झेप घेतली आहे. सतत राजकीय हाणामाऱ्या, हिंसाचार, भ्रष्टाचार यांच्या बातम्या ऐकून विटून गेलेल्या भारतीयजनसामान्यांना दिलासा देईल असेच हे यश आहे. विशेष लक्षात ठेवण्यासारखी बाब म्हणजे आपल्या अपंग क्रीडापटूंनाही याच वातावरणात राहावे लागते. पण याचा आपल्या अभ्यासावर व सरावावर कोणताही परिणाम होऊ न देता त्यांनी हे जे यश मिळवले ते अद्भुत म्हणावे लागेल. एकलव्याचा अंगठा द्रोणाचार्यांनी काढून घेतला होता. तरीही तो अचाट कोटीचा धनुर्धर झाला होता. यातला द्रोणाचार्यांच्या मत्सराचा व एकलव्य आदिवासी असल्यामुळे त्याच्यावर झालेल्या अत्याचाराचा भाग सोडा. पण शरीरात न्यून असूनही त्यावर मात करण्याची प्रेरणा देणारा एकलव्य हा या क्रीडापटूंचा आद्य प्रेरणादूत म्हणायला हवा. भारतात धडधाकट खेळाडूंनाही खेळाची पुरेशी साधने नसतात. सरावासाठी क्रीडांगणे, प्रशिक्षणासाठी पुरेशा सोई वा प्रशिक्षक मिळत नाहीत. क्रिकेट वगळता अगदी हॉकीसारख्या खेळांकडेही आपली सरकारे व प्रशासन सर्रास दुर्लक्ष करते. त्यातील खेळाडूंना आपल्या भवितव्याची चिंता सतावते. अशा देशात अपंग क्रीडापटूंचे हाल किती अधिक असतील याची कल्पना करता येण्यासारखी आहे. त्याही स्थितीत या खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय स्तरावर आणि ऑलिम्पिकसारख्या मंचावर दाखवलेला पराक्रम खरोखर प्रेरणादायी आहे.

### शीतलदेवीची कहाणी

यापैकी अनेक खेळाडूंनी अपघातात हात वा पाय गमावलेले आहेत. काहींनाजन्मतःचअपंगत्वाचा दोष आहे. शीतलदेवीची कहाणी ही सर्वांना ठाऊक झाली आहे. या स्पर्धांपूर्वीच बीबीसी, न्यूयॉर्क टाइम्स इत्यादींनी तिची जागतिक पातळीवर दखल घेतली होती. जम्मूसारख्या हिंसाचारग्रस्त प्रांतातील किश्तवाड जिल्ह्यात २००७ मध्ये तिचा जन्म झाला. एका विशिष्ट आजारामुळे जन्मापासूनच तिला दोन्ही हात नव्हते. मात्र आरंभापासूनच ती अत्यंत चपळ होती. दोन्ही हात नसूनही केवळ पायांच्या साह्याने ती सहज झाडांवर चढत असे. खेळांमध्येही तिला खूप रस होता. २०१९ च्या युवक क्रीडा स्पर्धांमध्ये अवघ्या बारा वर्षांच्या शीतलने चांगली कामगिरी केली. त्यामुळे भारतीय लष्कराच्या राष्ट्रीय रायफल्स दलाने तिच्या प्रशिक्षणाचा सर्व खर्च करण्याची तयारी दर्शवली. आरंभी तिला कृत्रीम हात बसवावेत असे तिच्या प्रशिक्षकांना वाटत होते. पण ते शक्य नसल्याचे डॉक्टरांनी सांगितले. तिला धनुर्विद्येत रस होता. मात्र हात नसलेल्यांना धनुर्विद्या शिकवण्याचा प्रशिक्षकांनाच कोणताही अनुभव नव्हता. मात्र मार्क स्टुटझमन या अमेरिकी क्रीडापटूची स्थिती नेमकी शीतलसारखीच असूनही पायांचा वापर करून त्याने धनुष्यबाण चालवण्यात प्राविण्य मिळवले होते. गेल्या तीन ऑलिम्पिक स्पर्धांमध्ये सातत्याने त्याला पदके मिळाली आहेत. यंदाही त्याने सुवर्णपदक मिळवले. त्याला दिलेल्या प्रशिक्षणाचा अभ्यास करून शीतलचा सराव सुरू झाला. पायाच्या बोटांमध्ये धनुष्य व तोंडात प्रत्यंचा धरून अचूक बाण सोडणे हे अद्भुत कौशल्य आहे. धडधाकट माणसाला दोन हातांचा वापर करूनही जे जमणे सोपे नाही ते येथे शीतलदेवी किंवा तिच्यासारख्या खेळाडूंना करायचे होते. पण तिने अवघ्या अकरा महिन्यांच्या सरावाने त्यात प्रभुत्व मिळवले. २०२२ च्या आशियाई अपंग स्पर्धांमध्ये तिने चक्क दोन सुवर्णपदकेमिळवली. यातील एक वैयक्तिक व एक महिला मिश्र प्रकारात होते. ही पार्श्वभूमी घेऊन ती पॅरिसमध्ये दाखल झाली तेव्हा महिला तिरंदाजीमधील ती जगातील सर्वात तरूण खेळाडू (वय १७ वर्षे) होती.

### चीनचा आदर्श

बहुदा प्रचंड प्रसिध्दी व अपेक्षांच्या दबावामुळे तिच्याकडून पुरेशी कामगिरी झाली नाही व तिला संमिश्र प्रकारात कास्य पदकावर समाधान मानावे लागले. मात्र तिने भारतीयांची मने आधीच जिंकली आहेत. दहा मीटरनेमबाजी अर्थात शूटिंगमध्ये टोकियो पाठोपाठ पॅरिसमध्येही सुवर्णपदक मिळवणाऱ्या अवनी लेखराची कहाणीही अशीच आहे. अकराव्या वर्षी एका अपघातात तिला अपंगत्व आलं. तिच्या हालचालींवरचे नियंत्रण गेले. मात्र तिच्या पालकांनी तिला खेळाडू होण्याचे प्रोत्साहन दिले. आज ती अवघी तेवीस वर्षांची आहे आणि तिच्या प्रकारात जगातील क्रमांक एकची मानांकित आहे. मैदानी क्रीडा प्रकारात म्हणजेच एथलेटिक्समध्ये आपल्या खेळाडूंनी तर यंदा इतिहास घडवला. आपल्या चार खेळाडूंना सुवर्णपदके मिळाली.पॅरिसमध्ये पदके मिळवलेल्याच नव्हे तर सहभागी झालेल्या सर्वच खेळाडूंची कहाणी प्रेरणादायी आहे. ती सर्व भारतीयांपर्यंत पोचवली पाहिजे. आपल्या देशात बस किंवा रेल्वेत चढण्यासाठी वाया इमारतींच्या पायऱ्या चढून जाण्यासाठी अपंगांना सोईचे होईल अशी व्यवस्था नाही. त्यांच्यासाठी योग्य अशी सार्वजनिक प्रसाधनगृहे नाहीत. एकूणच अपंगस्नेही वातावरण नाही. तरीही त्या सर्वांवर मात करून पुढे जाण्याची ही जी जिद्द व चिकाटी खेळाडू दाखवतात तिला सर्वांनीच सलाम करायला हवा. परिक्षेत, व्यवसायात किंवा एकूणच आयुष्यात अपयश आले म्हणून निराश होणाऱ्या किंवा आत्महत्या करणाऱ्या लाखो लोकांना संघर्ष करण्याची शिकवण देणारी हे सामुहिक यश आहे. त्याचा भरपूर सत्कार व सन्मान आपण करायला हवा. काही दिवसांपूर्वी पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धांमध्ये चीन व अमेरिका यांच्यात चुरस होती. दोहोंनाही सारखीच म्हणजे चाळीस सुवर्णपदके मिळाली. पण पॅरालिंपिकमध्ये मात्र तब्बल ९४ सुवर्ण व एकूण २२० पदके मिळवून चीनने इतरांना कित्येक मैल मागे टाकले. खेळाडूंचा सर्व खर्च चीनचे सरकार करते. अमेरिकेत मात्र खेळाडूंना खासगी कंपन्यांचे प्रायोजकत्व मिळवावे लागते. भारताने चीनचे उदाहरण डोळ्यापुढे ठेवून पुढची भरारी घ्यायला हवी.

विचार

# अर्थगती मंदावते आहे

***भारतीय रिझर्व्ह बँक, वेगवेगळ्या वित्तीय संस्था, तज्ज्ञ सकल उत्पादन वाढीबाबत आणि देशाच्या आर्थिक विकासाबाबत अंदाज व्यक्त करत असतात. या अंदाजांना अभ्यासाचा आधार असतो. राष्ट्रीय सांख्यिकी आयोगाच्या ताज्या आकडेवारीनुसार भारताचे सकल राष्ट्रीय उत्पादन घटले आहे. जगाच्या तुलनेत आर्थिक विकासाचा दर जास्त असला, तरी निवडणूककाळात विकासकामांकडे झालेले दुर्लक्ष हेच अर्थगती मंदावण्याचे कारण आहे.***



कैलास ठोळे

कोणत्याही देशात तज्ज्ञांनी व्यक्त केलेल्या भाकिताचा आधार घेऊन काही सुधारणात्मक पावले टाकता येतात. कधी कधी भाकिते चुकतात. याचा अर्थ भाकिते दुर्लक्षित करायची असतात, असे नव्हे. आर्थिक बाबतीतही तसेच असते. देशाच्या विकासावर परिणाम करणारे घटक हे देशांतर्गतच असतात असे नाही. निसर्गाच्या पावसावर अवलंबून असलेली शेती, जागतिक बऱ्या-वाईट घटनांचा परिणाम यावरही जीडीपी, अर्थव्यवस्थेची गती याबाबतचे अंदाज चुकू शकतात; परंतु अलिकडच्या काळात बहुतांश वित्तीय संस्था, अर्थतज्ज्ञ आणि रिझर्व्ह बँकेसारख्या मध्यवर्ती बँकेच्या गव्हर्नरांच्या अंदाजात एकवाक्यता नसते. अशा अंदाजावरून सामान्यांचा अनेकदा गोंधळ होत असतो. नोमुरा, मूडीज, क्रिसिल, रिझर्व्ह बँक आदी संस्थांचा अंदाज अगोदरच्या दिवशी एक असतो तर दुसऱ्या दिवशी वेगळा. हा अनुभवही आता नित्याचा झाला आहे. गेल्या आठवड्यात भारताच्या राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने जाहीर केलेल्या आकडेवारीनेही आता वेगवेगळ्या संस्थांना आणि रिझर्व्ह बँकेला आपले कुठे चुकले, याचा विचार करावा लागणार आहे. अर्थात एकीकडे हे आकडे जाहीर झाल्यानंतर लगेच दोन-तीन दिवसांमध्ये भारताच्या जीडीपीचा सुधारित अंदाज जाहीर झाल्यानंतर पुन्हा संभ्रम निर्माण झाला आहे. असे असले, तरी गेल्या तिमाहीची आकडेवारी लक्षात घेऊन कुठे चुकले, त्याचे काय परिणाम होतील, याचा विचार करायला हवा.

एप्रिल-मे-जून या तिमाहीमध्ये अर्थगती ७.२ टक्के दराने वाढेल, असा रिझर्व्ह बँकेचा अंदाज होता. प्रत्यक्षात ही वाढ ६.७ टक्के म्हणजेच अर्धा टक्क्याने कमी आहे. राष्ट्रीय सांख्यिकी आयोगाची आकडेवारी पाहिल्यास जीडीपीवाढीचा वेग गेल्या सव्वा वर्षातील सर्वात कमी आहे. गेल्या वर्षी याच तिमाहीमध्ये जीडीपीचा वेग ८.२ टक्के होता. त्या तुलनेत जानेवारी ते एप्रिल या काळापेक्षाही जीडीपीची गती सव्वा ते दीड टक्क्याने घटली आहे. देशाचे मुख्य आर्थिक सल्लागार व्ही. अनंत नागेश्वरन आणि रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी घटत्या जीडीपीवर केलेले मतप्रदर्शन आश्चर्यकारकरीत्या एकसमान आहे. लोकसभेच्या निवडणुका, त्यामुळे घटलेला सरकारी खर्च आणि थंडावलेली गुंतवणूक हे जीडीपी घटण्याचे कारण असण्यावर दोघांचेही एकमत आहे. देशात लोकसभा निवडणूक सुरु असल्याने आचारसंहितेच्या चार महिन्यांमध्ये प्रत्यक्षात विकासकामांकडे फारच कमी लक्ष होते. निवडणुकीच्या प्रचारात राजकीय पक्ष दंग तर व्यवस्थापनात सरकारी यंत्रणा गुंग असे चित्र असल्याने देशाच्या आर्थिक स्थितीकडे, जीडीपीकडे कुणीच फारशा गांभीर्याने पाहिले नाही. त्याचा परिणाम दर घटण्यात झाला.

देशात निवडणूककाळात सर्व यंत्रणा ठप्प होतात, हा अनुभव असतो. प्रशासकीय यंत्रणेला आधीच उल्हास असतो, त्यात फाल्गुन मास असे निवडणुकीच्या काळातील चित्र असते. आता शक्तीकांत दास यांनी नेमके त्याच मुद्दयावर बोट ठेवले आहे. तीन महिन्यांहून अधिक काळ लांबलेल्या आचारसंहितेने घात केला, असे त्यांनी म्हटले आहे. राजकीय लाभासाठी अर्थव्यवस्थेचा बळी कसा जातो, याचे हे ज्वलंत उदाहरण. निवडणुकांचे टप्पे कमी केले तर कमी काळ आचारसंहिता राहील आणि आर्थिक तसेच अन्य विकासयोजनांवर त्याचा कमी परिणाम होईल. याशिवाय मतदान संपलेल्या भागात घोषणा न करता नियमित कामे सुरू करता येतील का, याचा विचारही निवडणूक आयोगाने करायला हवा. निवडणुकीमुळे संपूर्ण देशच वेठीला धरला जात असेल, तर त्यात काही सुधारणा करता येतील का, याबाबत विचारविनिमय व्हायला हवा. निवडणुकीच्या काळात खरे तर खासगी क्षेत्रावर त्याचा परिणाम व्हायला नको; परंतु अनेक बाबतीत खासगी क्षेत्राची धोरणेही सरकारशी निगडीत असल्याचाही परिणाम होत असतो. सरकारचा हात थोडा जरी आखडता घेतला गेला तर विकासगाडा रुततो, हे गेल्या तिमाहीतील घटत्या आकडेवारीने दाखवून दिले आहे. निवडणुकीच्या काळात राजकीय पक्ष सभा, मेळावे, मिरवणुकांवर लाखो रुपयांचा खर्च करत असतात. वाहन व्यवस्था, झेंडे, बॅनर, कार्यकर्ते जमवणे, प्रवास, कार्यकर्त्यांची सोय आदींवर मोठ्या प्रमाणात उधळण होत असल्याचे चित्र असताना प्रत्यक्षात मात्र निवडणुकीच्या काळातील तिमाही आकडे पाहिले, तर आश्चर्याचा धक्का बसतो.

व्यापार, हॉटेल, वाहतूक, दळणवळण आणि प्रक्षेपणाशी संबंधित सेवांमधील वाढीचा दर या काळात ५.७ टक्क्यांवर घसरला आहे. २०२३-२४ हे निवडणुकीचे वर्ष नसताना याच काळातील तिमाही सेवावाढीचा दर ९.७ टक्के होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे जाहीर केले होते; परंतु अपवाद वगळता कधीही कृषी क्षेत्राच्या विकासाने दोन टक्क्यांच्या पुढे मजल मारली नाही. गेल्या तिमाहीमध्येही देशाच्या कृषी क्षेत्राने दोन टक्क्यांची वाढ नोंदवली. त्या आधीच्या दोन तिमाहींमध्ये या क्षेत्राचा दर एक टक्काही नव्हता. त्यामुळे तेवढाच दिलासा! कृषी क्षेत्र सरकारपेक्षा निसर्गाच्या मर्जीवर अवलंबून असते. सरकारची कृषी क्षेत्राबाबतची धरसोड धोरणे, साठे मर्यादा, निर्यातबंदी, वायदा बंदी आदी निर्णयांमधून सरकारने शेती क्षेत्राचे नुकसान केले आहे. कारखानदारी क्षेत्राची सात टक्क्यांपुढे तर बांधकाम क्षेत्राची दहा टक्क्यांपुढे साधलेली वाढ ही त्यातल्या त्यात समाधानाची बाब.

देशातील सर्वात महत्त्वाच्या आणि सर्वाधिक रोजगार देणाऱ्या तसेच सर्वाधिक गुंतवणूक असणाऱ्या सेवा क्षेत्रातील घसरण मात्र चिंताजनक आहे. सेवा क्षेत्राचे सकल मूल्यवर्धन गेल्या वर्षाच्या तुलनेत १२.६ टक्क्यांवरून थेट ७.१ टक्क्यांवर घसरले.

अमेरिका, युरोपसारखी मंदी नसली, तरी भारतातही शहरी-ग्रामीण ग्राहकांची मागणी कमी, उपभोगही अपेक्षेप्रमाणे न वाढणे यामुळे बाजारातील उलाढाल मंदावली आहे. असे असले, तरी चीन, अमेरिका, जपान, जर्मनी आदी देशांपेक्षा विकासदर जास्त असल्याची बढाई आपण मारत आहोत. चीन आणि अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेच्या आकाराच्या तुलनेत आपण कुठे आहोत, याचा विचार मात्र कधीच केला जात नाही. दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत जगात आपला कितवा क्रमांक लागतो, हे ही एकदा पहायला हवे. भारताची अर्थव्यवस्था पाच ट्रिलियन डॉलरची कधी होणार, याबाबतही वित्तीय संस्थांची मते परस्परविरोधी टोकाची आहेत. अर्थात रिझर्व्ह बँकेचा ७.२ टक्के वार्षिक वाढीचा अंदाज साध्य होईल की नाही, असा प्रश्न स्वाभाविकपणे विचारला जाईल. तथापि, आपण विकासाचा वेग पूर्णपणे गमावला आहे, असे आत्ता गृहीत धरणे चुकीचे आहे.

राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाच्या डेटाचे बारकाईने निरीक्षण केल्यास आशा करायला जागा आहे. जीडीपीचे दोन सर्वात प्रभावशाली घटक म्हणजे सरकारी खर्च आणि शेती. या दोघांपुढे क्षेत्रनिहाय समस्या आहेत. या तिमाहीमध्ये जीडीपीमधील सरकारी खर्चाचा वापर सिंगल डिजिटमध्ये राहिला. आता सरकार स्थापन होऊन वर्षभराचा अर्थसंकल्पही सादर झाला असून सरकारी खर्चही सामान्य होईल. या तिमाहीमध्ये निव्वळ करवाढही कमी राहिली. त्यात वार्षिक ४.१ टक्के मंद वाढ नोंदवली गेली. हे मूल्यांकन २०११-१२ च्या स्थिर किंमतींवर केले गेले. २०२३-२४ मध्ये याच तिमाहीत ही वाढ ७.९ टक्के होती. या वर्षी कमी पावसाची भीती नसून अतिवृष्टी किंवा परतीच्या पावसाला होणारा विलंब याची भीती आहे. अशा परिस्थितीमध्ये विलंबाने रब्बी आणि उन्हाळी पेरणी केलेल्या पिकावर परिणाम होऊ शकतो. वायव्य भारतातून मॉन्सूनची माघार १७ सप्टेंबरपासून सुरू होणार आहे. त्यात विलंब झाल्यास चक्र बिघडेल. रिझर्व्ह बँकेचे स्वतःचे ग्राहक विश्वास सर्वेक्षणदेखील सावधगिरी बाळगण्याचा सल्ला देते. निव्वळ अप्रत्यक्ष करप्राप्तींमध्ये तुलनेने कमी वाढ हे मंदीमागील मुख्य कारण मानले जाते. कारण याचा परिणाम एकूण सकल देशांतर्गत उत्पादन (जीडीपी) दरावर झाला आहे.

आजकाल

# भारतातल्या शेतक-यांचे खरे दुखणे काय आहे?

आनंद शितोळे

संपूर्ण देशातल जमिनीच्या मालकीच प्रमाण नेमक कस आहे ?

पूर्णतः शेतीवर अवलंबून असलेल्या लोकांची आकडेवारी. ११.२४ टक्के लोक भूमिहीन आहेत. हे भूमिहीन शेतमजूर आहेत ज्यांना शेतीतील कामाशिवाय दुसर काहीही येत नाही आणि यांच्याकडे शेती नसल्याने यांना तारण ठेवून कर्ज मिळत नाही.

४०.११ टक्के लोकांकडे एक एकरपेक्षा कमी जमीन आहे आणि अशी जमीन एकूण जमिनीच्या ३.८० टक्के आहे.

एक ते अडीच एकर जमीन असणारे लोक २०.५२ टक्के असून त्यांची एकूण जमीन १३.१३ टक्के आहे.

म्हणजे ५० टक्के लोकांकडे जमीनच नाही किंवा असलेली जमीन एकूण जमिनीच्या फक्त १३ टक्के आहे.

शेतीमध्ये शाश्वत उत्पन्न नाही आणि शेती धंदा बेभरवशाचा आहे. नोकरदार, धंदेवाईक लोकांना उत्पन्न आहे आणि शेतकऱ्याला नाही.

लोकसंख्या वाढली तशी शेतीच्या वाटण्या होऊन क्षेत्र घटली. शेतीच दरडोई उत्पन्न जेवढ घटल तेवढाच शेतीचा भांडवली खर्च, कर्जाचा व्याजदर वाढला, शेतीची औजार, बियाण, इंधन सगळ महाग झाल पण उत्पादनाला भाव मात्र वाढला नाही.

शेतकरी स्वतःच्या मालाची किंमत ठरवू शकत नाही. शहरातल्या मध्यमवर्गीय जनतेला पोसायला आणि स्वस्तात अनधान्य, भाजीपाला मिळावा म्हणून सरकार जीवनावश्यक वस्तूचे भाव नियंत्रित करत.

जीवनावश्यक वस्तूचे भाव नियंत्रित करून ग्राहकांना स्वस्त धान्य मिळाव पण जीवनावश्यक वस्तू पिकवणारा उत्पादक मेला तरी चालेल अशी धोरण.

शेतमाल नाशवंत म्हणून साठवण शक्य नाही.

साठवण किंवा प्रक्रिया करायला छोटे युनिट किंवा सहकारी तत्वावर छोटे कारखाने, प्रक्रिया उद्योग उभारायला बांधावर उपलब्ध असणार तंत्रज्ञान, सरकारची सुसंगत धोरण आणि वित्तपुरवठा हे काहीही नाहीये.

हि एक वर्षाची नव्हे तर दीर्घकालीन धोरणाची समस्या आहे. शेतीतील श्रमाला प्रतिष्ठा नाही कारण तिथे शाश्वत उत्पन्न नाही आणि स्थैर्य हमी नाही. सरकारी किंवा काही मोजक्या खाजगी नोकरीत उत्पन्न आहे आणि स्थैर्य आहे. व्यवसायात जोखीम असली तरीही पैसा आहे.

कारच्या शोरूममध्ये नोकरदार, धंदेवाईक गेला कि त्याला दोन तासात सहा टक्के दराने वीस लाखाची कार मिळते आणि शेतकरी बँकेत गेला कि महिनाभर हेलपाटे मारून १६ टक्के दराने लाखभर कर्ज मुश्कील होत मिळायला.

शेतीतील उत्पन्न- श्रमप्रतिष्ठा आणि नोकरी धंद्यातील उत्पन्न-श्रमप्रतिष्ठा यांच्यामधील असणारी दरी भयानक वेगाने वाढत आहे.

सगळे तथाकथित नेते, गावगन्ना पुढारी "शेतीवरील लोकसंख्येचे अवलंबित्व कमी केले पाहिजे" म्हणून आभाळात भाले घुसवतात.

शेतीतून मिळणार उत्पन्न स्वस्त पाहिजे, शेतीतून मिळणारा भाजीपाला स्वस्त पाहिजे, मोठ्या शहरात महानगरात घर घ्यायला गावाकडची दोन पाच एकर विकली जाईल अशी शेती पाहिजे पण शेतीवर लोकसंख्या अवलंबून नको ?

मग हे शहरातले मध्यमवर्गीय खाणार काय आहेत? कोटी रुपये समोर पडलेले असले तरी भूक भाकरी चपातीने भागते, भलेही ती विकत घेतलेली असली तरीही. आरक्षण मृगजळ आहे हे ठाऊक असूनही लोक का आग्रही आहेत त्यामागे या समस्या आहेत.

आर्थिकदृष्ट्या सक्षम असलेला शेतकरी जर चार माणसाना रोजगार देऊ शकतो तर तो मुलांना शिकवू शकतो आणि त्यांचे व्यवसाय उभे करू शकतो.

उपाय काय? पुरेस वीज आणि पाणी, शेतमालाला योग्य भाव आणि वितरण व्यवस्था, प्रक्रिया उद्योगांचे जाळे गावपातळीवर उभारायला तंत्रज्ञान आणि अर्थपुरवठा आणि किमान दहा वर्षाचे सरकारी धोरण, शेतीला भांडवली गुंतवणूक आणि खेळते भांडवल मिळायला कमीतकमी व्याजाने वित्तपुरवठा, सुलभ पीकविमा योजना,

शेतीपूरक उद्योग जसे दुधाचा धंदा, पोल्ट्री, शेळी-मेंढी पालन यासाठी कर्जपुरवठा, गोवंशहत्याबंदी सारखे बिनडोक कायदे रद्द करणे हे महत्वाचे उपाय आहेत.

हे करायचं सोडून किसान सन्मान योजना किंवा लाडकी बहीण ही फोत वरवरची मलमपट्टी आहे.

आजार मांडीला न मलम शेंडीला असली गत.

शेतीमाल जनतेसाठी निश्चितच कमी किंमतीतच उपलब्ध व्हायला पाहिजेत पण शेतकरी गारीत जाणार असतो म्हणून शेतकऱ्याला भरघोस अनुदान देणे, शेतकऱ्यासाठी सुलभ सोईसुविधा योजना, बी बियाणे, अवजारे,यंत्र तंत्र या सर्व गोष्टी जास्त अडथळे न आणता सहज उपलब्ध करून देणे हे भारतच नाही तर जगातील कोणत्याही देशाचं परम कर्तव्य असायला पाहिजे कारण अन्नसुरक्षा हि सर्वात पहिली प्राथमिकता असलेली गोष्ट असते.

**(साभार)**

लोकसंसद

## सहनशील कोकणी माणूस आणि ढिम्म प्रशासन

ऐन चतुर्थी सणाच्या तोंडावर एसटी कर्मचाऱ्यांनी संप पुकारुन आपल्या मागण्या पदरात पाडून घेतल्या. पण त्यामुळे कोकणी माणसाची मात्र प्रचंड परवड झाली. ऐन वेळेला एसटी प्रवासासाठी उपलब्ध न झाल्यामुळे अव्वाच्या सव्वा भाडे देऊन खासगी वाहतुकीचा पर्याय त्याने स्वीकारला. पण माणगाव येथील वाहतूककोंडीमुळे तासन्तास एकाच जागी अडकून पडावे लागले. सलग तीन दिवस माणगाव येथे वाहतूककोंडी होतेय. पहिल्याच दिवशी म्हणजे बुधवारी झालेल्या वाहतूककोंडीपासून धडा घेऊन वाहतुकीचे नियोजन करण्यासाठी प्रशासनाने जास्त प्रमाणात वाहतूक नियंत्रक नेमायला हवे होते. स्थानिकांचीही मदत घ्यायला हवी होती. पण कोकणी माणेस सहनशील असल्यामुळे प्रशासन नेहमीच ढिम्म राहते हा नेहमीचाच अनुभव या गणेशोत्सवातही पाहायला मिळतो. कोकणी माणसाच्या या गैरसोयीमुळे चतुर्थी सणाला तो वेळेवर गावी पोहोचेल का याचीच शंका वाटतेय.



**दीपक काशिराम गुंडये, वरळी.**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**१० सप्टेंबर**

**१८८०** : उस्मानिया विद्यापीठातील मराठीचे पहिले प्राध्यापक, निबंधकार, प्राचीन मराठी कवितेचे संशोधक चिंतामण नीळकंठ जोशी यांचा जन्म. 'मराठवाड्यातील अर्वाचीन वाङ्मयाचा इतिहास' या महत्त्वपूर्ण ग्रंथासह 'निरंजनमाधवाच्या स्तोत्र संग्रहावरील टीकात्मक निबंध' आणि 'श्रीधर चरित्र आणि काव्यविवेचन' ही त्यांची ग्रंथसंपदा. **१९००** : लेखक, पत्रकार, नाटककार, आत्मचरित्रकार बुद्धीवादी विचारवंत गजानन यशवंत चिटणीस यांचा जन्म. ब्राह्मो समाजाचे प्रचारक असणारे चिटणीस रॉयवादी होते. कालांतराने ते गांधी वादाकडे वळले. 'विजू', 'कुसुम', 'स्वामीजी', 'कुंदा', 'भांडवलदार' व 'दिदी' ह्या कादंबऱ्या. नाटक आणि 'माझ्या आठवणी' हे आत्मचरित्र अशी साहित्य संपदा. **१९१८** : लेखक, प्राचीन अभिजात साहित्य आणि इतिहासाचे अभ्यासक वसंत वरखेडकर यांचा जन्म. ह्यांची 'आई याज्ञवल्क्याची', 'प्रतिनिधी', 'सत्तावनचा सेनानी' ह्या कादंबरीसह 'आनंदीबाई', 'नीरो' ही नाटके अशी साहित्य संपदा. **१९१९** : लेखक वामन महादेव तथा दादा गोगटे यांचा जन्म. नोकरीनिमित्त प्रचंड भटकंती या अनुभवावर 'मी अनुभवलेला भूगोल' हे पुस्तक लिहिले. **१९२४** : ग्रंथलेखक, प्रकाशक, प्रवचनकार बापू नारायण रानडे तथा योगी ज्ञाननाथजी यांचा जन्म. ह्यांच्या चरित्र ग्रंथात 'डॉ. गोविंद महाराज उपळेकर', 'जोगन विठाबाई', 'जंगली महाराज उर्फ जागरनाथ : एक नाथपंथीय सिद्ध', 'महर्षी विनोद : जीवन दर्शन', 'श्री विश्वनाथ महाराज रूकडीकर', 'श्री शंकर महाराज' इ. प्रसिद्ध. १९२७ : होमिओपॅथिक डॉक्टर आणि त्यावर लेखन करणारे लेखक, ग्रंथ प्रकाशक डॉ. अनंत गोपाळ पळसुले यांचा जन्म. 'होमिओपॅथी म्हणजे काय?' या ग्रंथासह रोगांवर 'होमिओपॅथी', 'होमिओपॅथिक औषधे व त्यांचा उपयोग' अशी ग्रंथसंपदा. **१९२८** : लेखिका सुशीला माधव महाजन यांचा जन्म. 'दीपज्योति नमोऽस्तुते' हे राष्ट्रसेविका समितीच्या संस्थापिका लक्ष्मीबाई केळकर यांचे चरित्र. 'नाव तिकडंच घेऊ कसं ग बाई!' हा उखाण्यांचा संग्रह. 'स्वरजिजाई' हे जिजाबाईंचे काव्यमय चरित्र अशी साहित्य संपदा. **१९२९** : प्रवासवर्णनकार, ग्रंथकार रावजी भवानराव पावगी यांचे निधन. पाश्चात्य देशांचा तसेच विचारवंतांचा परिचय मराठी भाषकांना करून देण्याचे महत्वपूर्ण कार्य त्यांनी केले. राष्ट्रकथामालामधून त्यांचे 'तुर्कस्थान' प्रसिद्ध झाले. त्यानंतर 'चार्लस ब्राडला', 'एम.पी. यांचे चरित्र' व 'मिसेस ॲनी बेझंट' चरित्रग्रंथ त्यांचे प्रसिद्ध झाले. 'विलायतेचा प्रवास भाग १, २' ह्या नावाने त्यांचे पुस्तक प्रकाशित झाले आहे. **१९३३** : ज्योतिष, अध्यात्म, बालसाहित्य तसेच आकाशवाणीवर नाटिका, भाषणे आणि सहा पोथी ग्रंथाचे संपादन करणारे 'श्री गजानन आशिष' या मासिकाचे कार्यकारी, संपादक विश्वनाथ केशव फडके यांचा जन्म. ह्यांची 'अक्कलकोट महाराज', 'लिंकन', 'कुमारांसाठी अत्रे' या चरित्रासह 'अनंताची पाऊलवाट', 'नामसाधना', 'निवडक पंचतंत्र' तसेच ज्योतिषशास्त्र, बालसाहित्य, कथा मिळून १०० हून अधिक पुस्तक प्रसिद्ध. **१९३३** : लेखक, भक्तीसंगम या अध्यात्मिक मासिकाचे संपादक सुधाकर रावजी सामंत यांचा जन्म. ह्यांनी वसंतदादा पाटलांच्या चरित्रासह, 'कोकणची बाग-बागायती', 'क्रांतिकारी इंदिरा', 'गाडगेमहाराजांच्या सानिध्यात', 'नव्या मनूतील नव्या दमाचा सूर शिपाई', 'दिव्य प्रकाशाचा दीपस्तंभ', 'मानवतेचा महान पुजारी श्रीनाथ गगनगिरी महाराज' अशी संपदा. **१९३६** : मराठी विश्वकोश, वाईचे अभ्यागत संपादक, लेखक प्राचार्य डॉ. एकनाथ बापू ब्राह्मणकर यांचा जन्म. त्यांचे 'व्यवस्थापन शास्त्र', 'शिक्षणशास्त्र', 'व्याकरण', 'अर्थशास्त्र', विषयक २०० हून अधिक लेख प्रसिद्ध. याशिवाय 'आधुनिक व्यापार संघटन', 'औद्योगिक व्यवस्थापन', 'चिटणीसाचा व्यवसाय', 'जमाखर्चाची मूलतत्वे', 'व्यवसाय व्यवस्थापन', 'व्यवसाय संघटन', 'व्यापारशास्त्र परिचय', 'व्यावसायिक पत्रव्यवहार' आदी पाठ्यपुस्तके प्रसिद्ध. **१९३७** : वैचारिक विषयांवर लेखन करणारे, मराठी विश्वकोश मंडळाचे सचिव, पंढरीनाथ रावजी पाटील यांचा जन्म. 'इंदिरा गांधी तेजस्वी नेतृत्व', 'सामान्यातील असामान्य वसंतराव नाईक' आणि 'लोकानुवर्ती राज्यकर्ती शंकरराव चव्हाण' आदींची चरित्रे त्यांनी रेखाटली आहेत.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

# भटक्या कुत्र्यांचा सुळसुळाट, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण



**। तळा । वार्ताहर ।**

तळा बाजारपेठ परिसरात भटक्या कुत्र्यांचा उपद्रव वाढला असून या भटक्या कुत्र्यांच्या टोळीने शहरात अक्षरशः उच्छाद मांडला आहे. मागील काही दिवसांपासून तळा शहरात टोळीने फिरणाऱ्या भटक्या कुत्र्यांची संख्या वाढली आहे. यातील काही जण येणाऱ्या जाणाऱ्या माणसांचा व वाहनांचा भुंकत पाठलाग करत असल्याने परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. शहरात तसेच वसाहतीमध्ये ठीक ठिकाणी भटक्या कुत्र्यांचा कळप फिरत असल्याने त्याचा त्रास येथील रहिवाशांना होत आहे. रात्रीच्या वेळेस दुचाकीवरुन जाणाऱ्या वाहनचालकाच्या अंगावर भटकी कुत्रे भुंकत जात असल्याने अपघाताला निमंत्रण येत आहे. या भटक्या कुत्र्यांवर तळा नगरपंचायतीने त्वरित कारवाई करून कायमचा बंदोबस्त करण्याची मागणी तळा वासीयांकडून करण्यात येत आहे.तळा शहरात नवनवीन वस्ती वाढत चालली आहे. यामध्ये समर्थनगर, अंबिकानगर, साईनगर यांसारख्या ठिकाणी देखील भटक्या कुत्र्यांनी उच्छाद मांडलेला आहे. अनेक भटके कुत्रे या वसाहतींमध्ये विविध ठिकाणी फिरत असून, त्याचा त्रास रहिवाशांना होत आहे. लहान मुले आबालवृद्ध, वाहनचालक, दुचाकीस्वार यांच्या अंगावर धावून जखमी करण्याचे प्रकारही काही वेळा घडले आहेत. यामुळे तळा शहरात या भटक्या कुत्र्यांमुळे नागरिकांमध्ये सध्या भीतीचे वातावरण निर्माण झाले असल्याचे चित्र पहायला मिळत आहे.

## कोन शाळेमध्ये शिक्षक दिन

**। पनवेल । वार्ताहर ।**

लायन्स क्लब ऑफ पनवेल सरगमतर्फे शिक्षक दिनाचे औचित्य साधून कोन येथील प्राथमिक शाळेतील शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी क्लबच्या अध्यक्ष मानदा पंडित, स्वाती गोडसे, संजय गोडसे, शाळेतील शिक्षक वृंद, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष महेंद्र म्हात्रे, सदस्य निकिता जांभळे आदि मान्यवर उपस्थित होते. सरगम क्लबच्या अध्यक्ष मानदा पंडित यांनी सर्वांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या आणि मुलांना सांगितले की, चांगला अभ्यास करा आणि मोठे होऊन आपल्या शिक्षकांना समाधान मिळवून द्या. शाळेच्या मुख्याध्यापिका निशिगंधा मोकल यांनी सांगितले की, आई ही मुलांची पहिली शिक्षक असते पण शाळेत आल्यावर आपला शिक्षक हा सुद्धा आईप्रमाणेच मुलांवर संस्कार करत असतो. तसेच, आजपर्यंत ३२ वर्षांच्या कारकिर्दीत प्रथमच असा सत्कार झाल्यामुळे भारावून गेल्याचे ही त्यांनी सांगितले. शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष अशोक म्हात्रे यांनी सर्व शिक्षकांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या आणि लायन्स क्लब ऑफ पनवेल सरगमचे या कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल कौतुक केले. माधुरी रासकर यांनी प्रास्ताविक केले. त,र सुनीता खरजे यांनी आभार मानले.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

-मुख्य संपादक

**सिडको**
शहरांचे शिल्पकार

## नोटीस-१

साडेबावीस टक्के योजनेअंतर्गत वाटप भूखंडाचे हस्तांतरण **"ना हरकत पत्र"** मागणी अर्जानुसार नोटीस सर्व **श्री. राजेंद्र विजय पाटील व इतर २७, राहणार – जांभुळपाडा, ता. उरण, जि. रायगड – ४०० ७०२** ------- (अर्जदार).

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदारांनी खाली उल्लेखीत २२.५% योजनेअंतर्गत त्यांना वाटप करण्यात आलेल्या भूखंडाचे १) मे. सागिरा बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे भागीदार अ) मोहम्मद शहानवाज शेख, ब) अरसलन मसरुर खान, क) मोहम्मद शमीम खान २) मे. पामेचा होम्स तर्फे भागीदार अ) विणा मनोज फडकर, ब) ललित चंद्रकांत कुंभार, संजय मगणलाल जैन, मनोज मांगीलाल जैन व ३) कुणाल महेंद्र घरत, मोहम्मद अमीन मोहम्मद युसूफ पटेल, केयुर किरीट भयानी, इम्तीयाज सादिक पटेल, अ. सत्तार अ. हमीद पटेल यांचे नावे हस्तांतरण करण्याकरीता "ना हरकत प्रमाणपत्रासाठी" मागणी अर्ज केला आहे. त्यामधील समाविष्ट भूखंडाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| हस्तांतरण अर्ज क्रमांक | अर्जाचा दिनांक | हस्तांतरण करावयाच्या मालमत्तेचा तपशील | | | | वाटप दिनांक | भाडेपट्टा करार नोंदणी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नोड | सेक्टर | भूखंड क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) | | |
| ३५१४ | २९.०८.२०२४ | पुष्पक नोड | २८ | ३९ | २७९० | १५.०१.२०२४ | २८.०२.२०२४ |

या नोटीसद्वारे सदर हस्तांतरणाबाबत कोणत्याही हितसंबंधित व्यक्तीस / संस्थेस हरकत / तक्रार नोंदवण्याची असल्यास नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या मुदतीमध्ये लेखी स्वरूपात आवश्यक त्या पुराव्यासहीत **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन), १ ला मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर** या कार्यालयात सादर करण्यात यावी. उक्त १५ दिवसाच्या मुदतीमध्ये कोणतीही हरकत लेखी स्वरूपात या कार्यालयात प्राप्त न झाल्यास, सदर "ना हरकत प्रमाणपत्र" देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरण्यात येईल व हस्तांतरणाची पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**(भूसंपादन)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**
सिडको/जनसंपर्क/२१४/२०२४-२५

## नगरपंचायत पोलादपूर

**मु.पो. ता. पोलादपूर, जि. रायगड**
दुरध्वनी क्रं.०२१९१ - २४०००१
ई मेल आयडी -poladpurnagarpanchayat@gmail.com

जावक क्र. नपंपो/३५० | दिनांक ०९/०९/२०२४

**जाहीर निविदा सुचना**
(आस्थापना विभाग) जाहीर निविदा सूचना क्र. ०१/२०२४-२५

पोलादपूर नगरपंचायत इच्छुक ठेकेदार/पुरवठादार यांचेकडून खालील कामांसाठी दोन लिफाफा पद्धतीने मोहोरबंद निविदा मागवित आहे.

| अ. क्र | कामाचे नाव | निविदा फॉर्म फी (रुपये) | इसारा रक्कम/सुरक्षा अनामत (रक्कम) | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|
| १ | पोलादपूर नगरपंचायतीच्या कार्यालयीन कामाकरीता वाहन भाडे तत्वावर पुरविणे. | ५००/- | २,०००/- | १ वर्ष |
| २ | नगरपंचायत पोलादपूर हद्दिमध्ये विविध कार्यक्रमासाठी मंडप व्यवस्था करणे. | ५००/- | २,०००/- | १ वर्ष |
| ३ | पोलादपूर नगरपंचायत पाणी पुरवठा विभागा करीता दुरुस्तीकामी किरकोळ साहित्य पुरविणे. | ५००/- | २,०००/- | १ वर्ष |
| ४ | पोलादपूर नगरपंचायतीच्या पाणी पुरवठा करणाऱ्या साठवण टाक्यांची स्वच्छता करणे. | ५००/- | २,०००/- | १ वर्ष |
| ५ | नगरपंचायत पोलादपूर हद्दिमध्ये धुर फवारणी (Fogging machine) व गटारे पाणतळ जागेंवर जंतुनाशके फवारणी करणे. | १०००/- | ४,०००/- | १ वर्ष |
| ६ | नगरपंचायत पोलादपूर करीता विविध कार्यक्रम प्रसंगी व्हिडीओ शुटींग करणे व बॅनर पुरविणे. | ५००/- | २,०००/- | १ वर्ष |
| ७ | पोलादपूर नगरपंचायत कार्यालयामध्य IWBP PORTAL करीता ३ वर्ष कालावधी करीता खाजगी संस्थेकडून इंटरनेट (१००MBPS) स्पीड असलेली सेवा घेणे. | ५००/- | २,०००/- | ३ वर्ष |
| ८ | पोलादपूर नगरपंचायत जलशुध्दीकरण केंद्रावर आय.एस.आय.मार्क ब्लिचिंग पावडर पुरविणे. | ५००/- | २,०००/- | १ वर्ष |

**-अटी व शर्ती-**
१)विहीत नमुन्यातील सर्व अटी व शर्तीसह निविदा पत्रे/फॉर्मची विक्री नगरपंचायत कार्यालय, पोलादपूर येथे कार्यालयीन वेळेत दिनांक १०/०९/२०२४ ते १७/०९/२०२४ पर्यंत कामकाजाचे दिवशी निविदा फॉर्म फी रक्कम नगरपंचायत कार्यालयात भरणा करुन निविदा फॉर्म प्राप्त करुन घेता येतील.२) विहीत निविदा पत्रके वेगवेगळ्या दोन सिलबंद लखोट्यात दिनांक १७/०९/२०२४ रोजी कार्यालयीन वेळेत पोलादपूर नगरपंचायत कार्यालयात दाखल करता येतील. ३) प्राप्त झालेल्या निविदा दिनांक १८/०९/२०२४ रोजी कार्यालयीन वेळेत पोलादपूर नगरपंचायतीच्या मा. मुख्याधिकारी यांच्या दालनात उघडण्यांत येईल. ४) तांत्रिक लिफाफ्यामध्ये सादर करावयाची कागदपत्रे निविदा फॉर्ममध्ये नामुद करणेत आलेली आहेत. ५) उशिरा प्राप्त झालेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही. ६) सही नसलेली व अटी अगर शर्तीची निविदा स्विकारली जाणार नाही. ७) निविदा सूचना व करारनामा हा निविदेचाच एक भाग असेल. ८) पुरवठा करणेत येणारी साहित्य स्पेसिफिकेशनप्रमाणे मान्यताप्राप्त कंपन्यांचे पुरवठा करणे ठेकेदारास बंधनकारक राहील. ९) भाववाढीचे कलम कोणत्याही कारणास्तव मंजूर केले जाणार नाही. १०) कोणतीही निविदा कोणतेही कारण न देता स्विकारणे, नाकारणे अथवा सर्व निविदा नाकारणेचे अधिकार नगरपंचायतीने राखून ठेवले आहेत. ११) नगरपंचायतीने ज्या ठेका कंपनींना अथवा त्यांचेशी संबंधित व्यक्तींना निविदा न देण्याचा निर्णय घेतला आहे, अशा ठेका कंपनींना व त्यांचेशी संबंधित व्यक्तींना नगरपंचायतीकडे प्राप्त निविदांमध्ये कोणत्याही ठेकेदाराचे प्रतिनिधीत्व करता येणार नाही.

सही/-
**(विराज लबडे)**
**प्र.मुख्याधिकारी**
**नगरपंचायत पोलादपूर**

## खोपोली नगरपरिषद, खोपोली

**ता. खोपोली, जिल्हा. रायगड**
**ई-निविदा सूचना सन २०२४-२५**

जा.क्र. केएमसी/ई निविदा/आरोग्य/१०४८ | दिनांक ०९/०९/२०२४

खोपोली नगर परिषदेकडून नगर परिषदेच्या आरोग्य विभागास नगर परिषद क्षेत्रातील भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरणाचा व लसीकरणाचा कार्यक्रम राबविणे कामी अनुभवी पुरवठादार, ठेकेदार यांचेकडून e-tender पद्धतीने निविदा मागविणेत येत आहे.

| अ क्र | कामाचे नांव | निविदा फॉर्म फी | अनामत रक्कम | काम पूर्ण करणेची मुदत |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ६ |
| १ | नगर परिषद क्षेत्रांतील भटक्या श्वानांना पकडून त्यांचेवर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करणे व त्यांना रेविज प्रतिबंधक लस देणे | रु.१०००/- | रु.२५०००/- | १ वर्ष |

**कामाच्या अटी व शर्ती**
१. सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ई-निविदाद्वारे ऑन लाईन पद्धतीने संगणक प्रणाली होईल. सदर निविदा, नोटीसा, प्रसिद्धी, सूचना, आवश्यक असणारी कागदपत्रे, शुद्धीपत्रक इत्यादिची माहिती : http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.
२. वरील कामांची निविदा :http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावरुन खालील दिलेल्या कालावधीत असेल.

| वेळापत्रक | दिनांक | वेळ | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|---|
| निविदा प्रसिद्धी | १०/०९/२०२४ | सकाळी ११:०० वा | | |
| निविदा फॉर्म व परिशिष्ट मिळविण्याचा कालावधी (डाउनलोड) | १०/०९/२०२४ | सकाळी ११:०० वा.पासून | १७/०९/२०२८ | सायंकाळी ५.००वा पर्यंत |
| निविदा ऑन लाईन भरण्याचा कालावधी | १०/०/२०२४ | सकाळी ११:०० वा.पासून | १७/०९/२०२८ | सायंकाळी ५.००वा पर्यंत |
| ऑनलाईन निविदा उघडण्याचा कालावधी | दिनांक १८/०९/२०२४ सायं ५:०० वा किवा प्रशासकीय सोईनुसार | | | |

सही/-
**नोडल अधिकारी स्वच्छ सर्वेक्षण**
**खोपोली नगर परिषद**

# लाखोंचा गुटखा हस्तगत

**पनवेल :** नवी मुंबई पोलिसांच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने १ लाख १ हजार ८८० रुपये किंमतीचा गुटखा हस्तगत केला आहे. सर्वेशकुमार मोहनलाल मौर्या (२२) व शामु शिवगोविंद मौर्या (२४) हे दोघे छुप्या पद्धतीने गुटखा आणून त्याची विक्री पनवेल व नवी मुंबई परिसरात करीत असल्याची माहिती नवी मुंबई पोलिसांच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली होती. या दोघांना सापळा रचून अंमली पदार्थ विरोधी कक्षाने त्यांना ताब्यात घेतले आहे.

## जाहिर नोटिस

सर्व लोकांना या नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिल यांने मौजे - हेदवली, ता. कर्जत, जि-रायगड येथील जमिन मिळकती त्या मिळकतींचे मालक १. श्रीम प्राची प्रदिप दळवी, २. श्री. प्रतिमेश प्रदिप दळवी, ३. श्री. प्रणय प्रदिप दळवी यांच्या कडून कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरवले असुन सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालिल प्रमाणे

| सर्व्हे. नं. | हिस्सा. नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| ८ | २/अ | १.६३.०० | २.०१ |
| ९ | ४ | ०.३६.०० | ०.३३ |
| ३१ | २ | ०.३०.०० | २.९४ |

सदर मिळकतींच्या अनुषंगे खरेदी व्यवहाराबाबत आमच्या अशिलाने जमीन मालकांशी बोलणी केलेली आहे, तरी वर नमूद मिळकतीच्या अनुषंगे आमचे अशील व जमीन मालकांच्यादरम्यान होणाऱ्या खरेदी व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा तक्रार असल्यास तसेच कोणत्याही वित्तीय बॅक संस्था यांच्याशी तारण बोजा अथवा अन्य कुणाशीही गहाणखत, साठेखत, मृत्युपत्र, अथवा वहिवाटीसंबंधी कोणतीही तक्रार असल्यास त्यांनी हि नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसात आवश्यक त्या कायदेशीर कागदपत्रांसहीत खालील नमूद वकीलांच्या पत्त्यावर लेखी हरकत नोंदवावी. विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत अथवा तक्रार न आल्यास सदरहू मिळकत हि निर्वेध व बोजारहित असल्याचे मानून आमचे अशील सदरहू व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण: कर्जत
दि: ०८/०९/२०२४

वकील
**ॲड. सचिन संजय सुर्वे**
पत्ता: नाथ सदन, आमराई रोड,
ता. कर्जत, जि. रायगड, ४१०२०१.
मो.नं ९०२८५४६१५७/७३८५५४६१५७

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. राजेश प्रभाकर पाटील वगैरे रा. शहाबाज, ता. अलिबाग यांनी दिलेल्या माहितीवरुन व त्यांचे सुचनेवरुन सर्वांस कळविण्यात येते की, खाली वर्णन केलेली मिळकत आमचे अशिलांचे मालकीची व खुद्द ताबेकब्जा वहिवाटीची मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नंबर | जुना सर्व्हे नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|---|
| शहाबाज ता. अलिबाग | २९७ | ६६/१,६७/१ब | १-४१-९० | १९-८७ |

सदर मिळकतीबाबत मा. दिवाणी न्यायाधिश वरीष्ठ स्तर यांचे कोर्टात रे. मु. नं. ११७/२०१० चा दावा चालू असून मे. दिवाणी न्यायालयाने मनाई हुकूमाचे कामी आमचे अशिलांचे बाजुने निकाल दिलेला आहे. अशी पार्श्वभुमी असताना सदर मिळकतीमध्ये महादेव पोसू पाटील व त्यांचा मुलगा संजय महादेव पाटील, रा. शहाबाज, ता. अलिबाग हे बेकायदेशीरपणे न्यायालयीन प्रकरणे चालू असताना त्रयस्थ ईसमांचे हक्क निर्माण करण्याच्या तयारीत आहेत. तरी सदर मिळकतीतील आमच्या अशिलांचे हक्क, हितसंबंध, ताबा व मालकी लक्षात घेवून कोणीही सदर मिळकतीचा कसलाही व्यवहार महादेव पोसू पाटील व त्यांचा मुलगा संजय महादेव पाटील, रा. शहाबाज, ता. अलिबाग यांचे बरोबर करु नये. असा कोणताही व्यवहार कोणीही केल्यास तो प्रामाणिक खरेदीदार होणार नाही व असा कोणताही व्यवहार आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही व आमच्या अशिलांनी केलेल्या न्यायालयीन कारवाईस संबंधीत ईसम जबाबदार राहतील. हे कळावे.

अलिबाग
दि. ०९-०९-२०२४

सही/-
**ॲड.आर.बी.कोसमकर**
जिल्हा न्यायालय रायगड
ता.अलिबाग, जि.रायगड

## जाहीर सुचना

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मोजे बामणगाव, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील खाली नमुद वर्णनाची शेत जमिन मिळकत श्री. राजेंद्र जनार्दन पाटील व सौ. दर्शना राजेंद्र पाटील, राहणार पंतनगर, अलिबाग यांच्या खुद्द मालकीची असून, सदरील शेतजमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझे अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान झालेला आहे. सदर शेतजमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीत अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून चौदा (१४) दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वानी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | हि.नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|---|
| बामणगाव, ता. अलिबाग | ८२ | | ०-५६-००<br>०-११-६० पो.ख.<br>०-६७-६० एकूण | ८-२५ |
| सदरील मिळकतीपैकी ०-३३-८० (हे. आर) शेतजमिन मिळकत. | | | | |

अलिबाग,
दिनांक १०/०९/२०२४

सही/
**(ॲड. निवास ना. पाटील)**
श्री क्षेत्र, सहाण,
ता. अलिबाग, जि. रायगड.
खरेदीदाराचे वकील

## ग्रामीण रुग्णालय मुरुड-जंजिरा,जि. रायगड.
## निविदा जाहिरात

ग्रामीण रुग्णालय मुरुड जि. रायगड येथील वापरुन निरुपयोगी झालेली रुग्णालयीन साहित्य व साधन सामुग्री विक्री करावयाची आहे. (त्यामध्ये :- लोखंडी साहित्य, प्लास्टिक, ईनॅमल साहित्य, स्टिल साहित्य, पुट्टा, रद्दी इ. साहित्य)

तरी प्रस्तुत साहित्य खरेदी करण्यास इच्छुक असलेल्या ठेकेदारांनी त्यांचे सिलबंद दरपत्रके जाहिरात प्रसिद्ध झालेल्या दिनांकापासून ७ दिवसांच्या आत ग्रामीण रुग्णालय मुरुड जि. रायगड येथे प्रत्यक्ष सादर करावे.
टिपः- अटी व शर्ती लागू.

सही/-
**(डॉ. उषा चोले)**
**वैद्यकिय अधिक्षक**
**ग्रामीण रुग्णालय, मुरुड, जि. रायगड**

रायगड जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यासेवक सहकारी पतसंस्था मर्या. पेण-रायगड.

## रायगड जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यासेवक सहकारी पतसंस्था मर्या. पेण - रायगड.

रजि.नं.: आर.जी.डी./अे.बी.जी./बी.एन.के./(ओ)/१०३
दिनांक १/८/१९९१

**३३ वी वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस (फक्त सभासदांसाठी)**

रायगड जिल्हा माध्य. व उच्च माध्य. विद्यासेवक सहकारी पतसंस्था मर्या. पेण-रायगड या संस्थेची सन २०२३-२४ सालची ३३ वी वर्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. २२ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ठिक ११:३० वाजता पतसंस्था मुख्य कार्यालय श्री. एम. एन. पाटील सहकार भवन मधील श्री. जी. एम. पाटील सभागृह, पेण, ता. पेण, जि. रायगड या ठिकाणी मा. अध्यक्ष श्री. राजेंद्र बाजीराव पालवे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. तरी सर्व सभासदांनी या सभेस उपस्थित राहून सहकार्य करावे, ही विनंती.

**※ सभेपुढील विषय ※**

१. संस्थेच्या दि. १०/०९/२०२३ रोजी झालेल्या वार्षिक सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२.संचालक मंडळाने संस्थेचा तयार केलेला दि. ०१/०४/२०२३ ते ३१/३/२०२४ या मुदतीचा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक स्विकारणे.
३. संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा वाटणीस मंजुरी देणे व लाभांश जाहिर करणे.
४. सन २०२३-२४ या मुदतीच्या लेखापरिक्षण अहवालाचे वाचन करुन स्विकारणे.
५. सन २०२४-२५ या मुदतीच्या वैधानिक लेखापरिक्षणासाठी म.स.सं. अधिनियम १९६० मधील कलम १(१) ब अन्वये संचालक मंडळाने नेमणूक केलेल्या लेखापरिक्षकास मंजूरी देणे.
६. सन २०२४-२५ या मुदतीच्या अंतर्गत लेखापरिक्षणासाठी संचालक मंडळाने नेमणूक केलेल्या लेखापरिक्षकास मंजूरी देणे.
७. सन २०२४-२५ या कालावधीच्या अंदाज पत्रकास मंजुरी देणे.
८. वार्षिक सर्वसाधारण सभेस हजर राहू न शकलेल्या अनुपस्थित सभासदांची अनुपस्थिती क्षमापीत करणे बाबत.
९. नफ्यातून राखीव निधीची तरतूद १०% करण्यास मंजुरी देणे बाबत.
१०. मा.अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या आयत्या वेळच्या विषयांवर चर्चा करणे.

**श्री.अनिल तुकाराम अंबावले**
स्थळ : पेण | आपला विश्वासू
दिनांक : ०१ सप्टेंबर २०२४ | सचिव
**रायगड जिल्हा माध्य. व उच्च माध्य. विद्यासेवक सहकारी पतसंस्था मर्या. पेण-रायगड**

१. गणसंख्ये अभावी सदरची सभा तहकुब करावी लागल्यास सदर सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल. अशा सभेस गणसंख्यापुर्ततेची आवश्यकता नाही.
२. सोबतच्या अहवाला संबंधीचे प्रश्न अगर सूचना असल्यास सभासदांनी त्या दि. १७ सप्टेंबर २०२४ पर्यंत पतसंस्थेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत द्याव्यात.
३. सभेपुढील विषयासंबंधीचे कागदपत्र पतसंस्थेच्या कार्यालयात कामकाजाच्या वेळेत पहावयास मिळतील.
४. ज्या सभासदांनी अद्याप आपले वारस नेमले नसतील त्यांनी कार्यालयात येवून वारसांच्या नावाची नोंद करावी.
५. सभेस येताना अहवालाची प्रत सोबत आणावी.

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय

(तहसिलदार कार्यालय मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड, जिल्हा रायगड.)
ज.म.र. अर्ज १६५/२०२४

## जाहिर नोटीस

श्रीमती शर्मिला शरद बांद्रे
(विवाहापूर्वीचे नांव-अनुसया बळीराम पोटले) — अर्जदार
रा मु.पो.नांदगांव, ता. मुरुड-जंजिरा
जिल्हा रायगड.

विरुद्ध

ग्रामसेवक,
ग्रुप ग्रामपंचायत विहूर, ता. मुरुड, — सामनेवाला
जिल्हा रायगड.

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार शर्मिला शरद बांद्रे (विवाहा पूर्वीचे नांव - अनुसया बळीराम पोटले) यांचा जन्म दिनांक ०२/०२/१९७५ रोजी माहेरच्या घरी म्हणजेच विहूर ता. मुरुड-जंजिरा, जिल्हा रायगड येथे झाला असून त्यांच्या जन्माची नोंद विहूर ग्रामपंचायत कार्यालय यांचे जन्म/मृत्यू नोंद रजीस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणे करीता मुरुड न्यायालयात रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ मॅरेज ॲन्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार शर्मिला शरद बांद्रे (विवाहापूर्वीचे नांव - अनुसया बळीराम पोटले) यांचा दिनांक ०२/०२/१९७५ रोजी जन्म झाल्या बाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलांमार्फत मे. न्यायालयांत दिनांक २५/०९/२०२४ रोजी सकाळी ११-०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून अर्जदार यांना जन्म/मृत्यू नोंद रजीस्टर मध्ये जन्माची नोंद होणे करीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता. १४/०/२०२४ रोजी माझ्या सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली. कळावे.

सही/-
**(रोहन शिंदे)**
**तहसिलदार मुरुड-जंजिरा**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे सासवणे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री.रमेश नाना म्हात्रे यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|
| सासवणे | ४९८ | ०-५८-००<br>पो. ख. ०-०४-००<br>०-६२-०० | ९.०० |

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्कांची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : १०/९/२०२४

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील**
अे/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राम्हणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

# कृषीवल गणेश दर्शन स्पर्धा २०२४



● श्री. सत्यजित वसंत शिंदे, अलिबाग-रायगड



● ॲड. निवास पाटील, अलिबाग



● अशोक दामोदर म्हात्रे, मानी यांचेइथली श्रींची प्रसन्न सजावट. (छाया : सुरेश खडपे)



● श्री. गणेश परशुराम पाटील, मु.पो. कामार्ले आपल्या कुटुंबातील गणरायाचे दर्शन घेताना. (छाया : अब्दुल सोगावकर)



● श्री व सौ. रमेश पाटील काटकर आळी चौल. (छाया : सुरेश खडपे)



● श्री व सौ. जगदीश चांगदेव कुलपे यांच्याइथली श्री गणेशाची आकर्षक सजावट. (छाया : सुरेश खडपे)



● संदेश सदानंद महाकाळ यांचे निवासदर्शन श्री गणेशाची सुबक मूर्ती (छाया : सुरेश खडपे)



● श्री व सौ. निलेश वासुदेव काटकर आळी चौल. (छाया : सुरेश खडपे)



● श्री एकनाथ थेरोंडकर थळ यांचेइथली श्री गणेशाची नयनरम्य मूर्ती (छाया : सुरेश खडपे)



● श्री. सदानंद म्हात्रे यांचे निवासस्थानी श्री गणेशाची मनमोहक मूर्ती (छाया : सुरेश खडपे)



● श्री. अशोक परशुराम पेडणेकर किहीम यांचे निवासस्थानी श्री गणरायाची नयनरम्य मूर्ती. (छाया : सुरेश खडपे)



● मुरूड मच्छिमार सोसायटीचे चेअरमन मनोहर महादेव बैले यांच्या निवासस्थानी बसलेला गणपती बाप्पा. (छाया : गणेश चोडणेकर)



● नवापाडा कोळीवाडा मुरूड माजी उपाध्यक्ष ऋषिकेश दामोदर बैले यांच्या निवासस्थानी बसलेला गणपती बापा. (छाया : गणेश चोडणेकर)



● मनोहर दगडू काळे यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाचे दर्शन घेताना. ज्येष्ठ समाजसेवक सुधीर गायकवाड व सरपंच पिंट्या ठाकूर (छाया : अब्दुल सोगावकर)



● मुनवली येथील सामाजिक कार्यकर्ते श्री सचिन घाडी यांच्या निवासस्थानी गणरायाचे दर्शन घेण्यासाठी सोगाव आदिवासीवाडीवरील महिला वर्ग. (छाया : अब्दुल सोगावकर)



● मुरूड बाजारपेठेतील तुषार संजय करडे यांच्या निवासस्थानी बसलेला गणपती बाप्पा. (छाया : गणेश चोडणेकर)



● श्री. प्रसाद वसंत काठे किहीम-कामथ यांच्या घरी विराजमान गणपतीचे दर्शन घेताना सरपंच पिंट्या गायकवाड व सुदेश सावंत. (छाया : अब्दुल सोगावकर)



● मुनवली येथील वै. मधुकर हरिश्चंद्र नागावकर यांच्या निवासस्थानी गणरायाची सुबक मूर्ती व केलेली सुंदर आरास. (छाया : अब्दुल सोगावकर)



चोंढी येथील श्री. प्रसाद प्रदीप आमले यांच्या निवासस्थानी विराजमान गणपतीचे दर्शन घेताना सरपंच पिंट्या गायकवाड. (छाया : अब्दुल सोगावकर)

पान ३ वरून

## ‘आपत्ती’ला निधीची प्रतीक्षा

पण योग्य वेळेत मंजुरी आणि त्याचा अंमलबजावणी झाली असती तर काही घटना टाळता आल्या असत्या, असे निरीक्षण ज्येष्ठ पर्यावरणशास्त्रज्ञ माधव गाडगीळ यांनी याआधी आधी झालेल्या आपत्तीच्या दुर्घटनांवरुन नोंदवलं आहे. त्यामुळेच आपत्तीच्या उपाययोजनांसाठी स्थानिक प्रशासनाने पाठवलेल्या प्रस्तावांना सरकारने तात्काळ मंजुरी देणे गरजेचे आहे. तसेच मंजुरी देऊन ते काम व्यवस्थित होत आहे की नाही, यावरदेखील लक्ष ठेवणे गरजेचे आहे.

## दोन हजारांवर हरकती

आयुक्त मंगेश चितळे यांनी ५ ऑगस्टला या आराखड्याला पालिकेच्या प्रशासकीय विशेष सर्वसाधारण महासभेत मंजूर केल्यानंतर आराखडा शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध केला. त्यावेळी आरखड्यावर हरकती नोंदवण्यासाठी ३० दिवसांची मुदत नागरिकांना देण्यात आली होती. ही मुदत आता पूर्ण झाली असून, पालिकेने दिलेल्या मुदतीत सर्वात जास्त म्हणजे ५०० च्या आसपास हरकती पालिकेत समाविष्ट तळोजा मजकूर, सिद्धी करवले, घोट, चाळ या नो डेव्हलपमेंट झोन म्हणून जाहीर गावातून नोंदवण्यात आल्या आहेत. त्या खालोखाल पाटबंधारे विभागाने नदी क्षेत्रात जाहीर केलेल्या रेड आणि झोन परिसरातून नोंदवण्यात आल्या आहेत, तर झोपडपट्टी म्हणून जाहीर क्षेत्रातूनदेखील हरकती नोंदवण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे.

## तिहेरी हत्याकांडातील आरोपीचा शोध सुरूच

सुमारास दहा वर्षीय विवेक मदन पाटील याचा मृतदेह नेरळ कळंब रस्त्याखालून वाहणाऱ्या नाल्यातील पाण्यात आढळून आला होता. त्यानंतर ३० वर्षीय अनिशा मदन पाटील यांचा मृतदेहदेखील त्याच नाल्यातील पाण्यात आढळून आल्यावर ३५ वर्षीय मदन जैतू पाटील यांचा मृतदेह त्यांच्या राहत्या घरात आढळून आला होता. त्यानंतर पोलिसांकडे मृत महिला अनिशा यांचे भाऊ माले या गावातील रुपेश वेहले यांनी नेरळ पोलिसांकडे तक्रार केली होती. संबंधित तिन्ही मृतदेह पोलिसांनी रविवारह दुपारी कर्जत उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवले होते. या काळात संशयित तरुणांकडून तिघांच्या खुनाबद्दल कोणतीही माहिती मिळाली नाही. पोलिसी खाक्या दाखवूनदेखील संबंधित खून प्रकरणातील आरोपी जेरबंद होत नसल्याने या घातपाताचा उलगडा झाला नाही. त्यामुळे या तिहेरी खून प्रकरणाचे तपास अधिकारी पोलीस उपअधीक्षक धूळदेव टेले यांनी संबंधित तिन्ही मृतदेहाचे शवविच्छेदन मुंबई येथील जे जे रुग्णालयात करण्याचा निर्णय घेतला आणि मृतदेह मुंबई येथे पाठवून दिले.याप्रकरणी नेरळ पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे. त्या गुन्ह्यात अज्ञात व्यक्ती किंवा व्यक्तींनी मदन पाटील यांच्या घरात घुसून कोणत्यातरी अज्ञात कारणाने कोणत्यातरी अज्ञात शस्त्राने शरीरावर वार करून ठार मारून त्यांना घराच्या पाठीमागील बाजूने वाहणाऱ्या नाल्याच्या पाण्यात टाकून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला, असा गुन्हा दाखल केला असून, घटना घडली त्या घरात श्रीगणेशाचे आगमनदेखील शनिवारी झाले आहे. जे जे रुग्णालयातून शवविच्छेदन केलेले मृतदेह यांच्यावर पोशीरपाडा येथेच अंतिम संस्कार करण्यात यावेत, अशी भूमिका माले येथील वेहले कुटुंबाने घेतली होती. तर बोरगाव येथील पाटील कुटुंबाने बोरगाव येथे अंतिम संस्कार करण्यात यावेत, अशी भूमिका घेतली होती.सकाळी माले येथील शंभरहून अधिक लोक नेरळ कळंब रस्त्याने बोरगाव गावाकडे जाणारा बोरगाव रस्ता अडवून ठेवला होता. त्यामुळे मृतदेह घेऊन आलेल्या शववाहिन्या कर्जत मुरबाड राष्ट्रीय महामार्ग रस्त्यावरील भोईरवाडी गावाजवळ थांबवून ठेवल्या होत्या.शेवटी नेरळ पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी शिवाजी ढवळे यांनी कळंब येथे धाव घेऊन बोरगाव फाट्यावर रस्ता अडवून बसलेल्या माले गावातील ग्रामस्थांची समजूत काढली आणि शेवटी अंतिम संस्कार बोरगाव येथे करण्याचे नक्की झाले. त्यांनतर रस्त्यात थांबवून ठेवलेली शववाहिनी बोलावून घेण्यात आली. दुपारी बारा वाजता शववाहिनीमधून मृतदेह बोरगाव गावी आणण्यात आले. त्यानंतर तेथे शेकडो शोकाकुल वातावरणात मदन जैतू पाटील, अनिशा मदन पाटील आणि दहा वर्षीय विवेक मदन पाटील या तिघांवर अंतिम संस्कार चिल्हार नदीवर करण्यात आले. तेथे मदन जैतू पाटील, अनिशा मदन पाटील यांना अग्नी देऊन अंत्यसंस्कार करण्यात आले, तर विवेक या मुलाचा मृतदेह जमिनीत दफन करण्यात आला.

## लाडक्या बहिणीसाठी सरकारची धावाधाव

न्यायालयाने म्हटले की, किती दिवसात तुम्ही जमीन देणार आहात हे स्पष्ट केलेले नाही. त्यानंतर राज्य सरकारने तीन महिन्यांत ही जमीन सुपूर्द करणार असल्याचे म्हटले आहे. जानेवारीच्या पहिल्या आठवड्यापर्यंत ही सगळी जमीन हस्तांतरित होईल, असा विश्वास राज्य सरकारने दाखवला आहे. राज्य सरकारच्या वन विभागाचे सचिव राजेश कुमार यांनी कोर्टासमोर मागितलेली माफी न्यायालयाने मान्य करून माफीची सुमोटो याचिका रद्द केली आहे. सरकारने वेळेत ही जमीन याचिकाकर्त्यांना देण्याचे निर्देश दिले आहेत. पुणे जिल्हाधिकारी यांनी स्वतः लक्ष घालून येवलेवाडी पुणे येथील २४ एकर ३८ गुंठे जमीन याचिकाकर्त्यांना द्यावी, असेही निर्देश न्यायालयाने दिले. दरम्यान, सोमवारच्या सुनावणीमध्ये न्यायालयाने कुठेही लाडकी बहीण योजनेचा उल्लेख केला नाही. निकालातदेखील कोर्टाने त्याचा कुठेच उल्लेख केलेला नाही दिसून आला नाही. यापूर्वीच्या सुनावणीमध्ये सरकारच्या इतर योजना आणि लाडकी बहीण योजना बंद करण्याचा इशारा न्यायालयाने दिला होता.

## रितू कोळीची मृत्यूशी झुंज अपयशी

गेला आहे. उरण चार फाटा ते करंजा दिशेने जाणारा डंपर जात असताना स्कुटीवर रितू संजीव कोळी समांतर दिशेला जात होती. त्याचवेळी रीतूचा तोल जाऊन ती रस्त्यात पडली आणि थेट डंपरच्या मागच्या चाकाच्या खाली आली. नवीन शेवा गावातील रहिवासी रमेश चव्हाण हा डंपर चालवत होता. या अपघातात रितू गंभीर जखमी झाली होती. तिला तात्काळ गाडे हॉस्पिटल, द्रोणागिरी येथे दाखल करण्यात आले; परंतु प्रकृती गंभीर असल्याने डॉक्टरांनी तिला पुढील उपचाराकरिता जसलोक हॉस्पिटल, मुंबई येथे पाठविले. या हॉस्पिटलमध्ये तिच्यावर उपचार सुरू असताना तिचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांमार्फत सांगण्यात आले.

## पेझारीमध्ये वक्तृत्व स्पर्धा

रणरागिणी हा विषय असेल. तसेच खुल्या गटासाठी विधानसभेतील एक भाषण व मी अनुभवलेली रणरागिणी असे दोन विषय आहेत. सहा ते १२ वयोगटातील प्रथम क्रमांकाला तीन हजार रुपये व चषक, द्वितीय क्रमांकाला दोन हजार रुपये व चषक, तृतीय क्रमांकाला एक हजार रुपये व चषक देऊन गौरविले जाणार आहे. १२ ते १८ वयोगटातील प्रथम क्रमांकाला चार हजार रुपये व चषक, द्वितीय क्रमांकाला तीन हजार रुपये व चषक, तृतीय क्रमांकाला दोन हजार रुपये चषक तसेच खुल्या गटातील प्रथम क्रमांकाला रोख दहा हजार रुपये व चषक, द्वितीय क्रमांकाला रोख सात हजार रुपये व चषक आणि तृतीय क्रमांकाला रोख पाच हजार रुपये व चषक देऊन गौरविण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.शेतकरी कामगार पक्षाच्या जेष्ठ नेत्या माजी राज्य मंत्री स्वर्गीय मिनाक्षीताई पाटील यांच्या बरोबर काल व्यतीत केलेले आप्त स्वकीय, सहकारी, मित्रमैत्रिणी व कार्यकर्ते यांनी त्यांच्या विषयीचे अनुभव, मनोगत आपल्या कमीत-कमी १५०० शब्दात लिहून त्याची पीडीएफ करून ९१३०६२९९२९ या मोबाईल क्रमांकावर पाठवणे. तसेच, लेख पाठविण्याची अंतिम तारीख ३० सप्टेंबर असून मुळ प्रत आणि त्यासोबत आठवणीतला फोटो असेल तर सुशिला सदन, घर क्रमांक ७७, मु. आंबेपुर, पो. पोयनाड ता. अलिबाग, जि. रायगड, या पत्त्यावर पाठवणे. याचबरोबर लेखकाचा पासपोर्ट साइज फोटो व फोन नंबरसुद्धा नमुद करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## मच्छिमारांना दीड कोटींचा गंडा

घेऊन ती मासळी अन्य ठिकाणी विक्रीसह वेगवेगळ्या कंपनीत प्रक्रियेसाठी पाठवितात. मच्छिमार रात्रीचा दिवस करून समुद्राच्या लाटांशी झुंज देत जिवाची पर्वा न करता मासेमारी करतात. परंतु, त्यांना फसविण्याचा प्रकार जिल्ह्यात उघड झाला आहे. अलिबाग कोळीवाड्यातील बंदरावर नायाब मजिद सोलकर या व्यापाऱ्याने अदिन सी फुड नावाची कंपनी तयार केली. त्याचे एक कार्यालय कोळीवाड्यात उभे केले. मच्छिमारांचा विश्वास संपादन करून त्यांच्याकडून मासळी खरेदी केली. मच्छिमारांकडून घेतलेल्या मासळीचे बिल अदीन सी फूड कंपनीच्या नावाने दिले जात होते. सोलकर यांनी नऊ सप्टेंबर २०२३ ते १० जानेवारी २०२४ या कालावधीत मच्छिमार मिथुन सारंग यांच्याकडून ५० लाख रुपये, रणजीत खमीस यांच्याकडून ३७ लाख रुपये, विशाल बना यांच्याकडून ३० लाख रुपये व प्रदोष तांडेल यांच्याकडून ३५ लाख अशी एकूण एक कोटी ५२ लाख रुपयांची मासळी उदारीवर घेतली. पैसे नंतर मिळणार या आशेने चौघांनी विश्वासाने मासळी उदारीवर दिली. परंतु, त्यांनी अलिबागमधील कार्यालय बंद करून ते गायब झाले. मच्छिमारांची फसवणूक झाल्याचे लक्षात येताच अलिबाग पोलीस ठाण्यात सोलकरविरोधात लेखी तक्रार केली.




## लोकशाही दिनी चार अर्ज निकाली

विभागीय स्तरावरील विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. कोकण विभागीय स्तरावर आतापर्यंत झालेल्या लोकशाही दिन कार्यक्रमात एकूण प्रलंबित अर्जांची संख्या दहा असून, आज आलेल्या अर्जांची संख्या दोन आहे, असे एकूण १२ अर्ज प्राप्त होते. त्यापैकी चार अर्ज निकाली काढण्यात आले असून, आठ अर्ज प्रलंबित आहेत.

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**१० सप्टेंबर**

१) श्री. चंद्रकांत गोवर्धन शेट वेश्वी, अलिबाग, १०-९-१९५२
२) श्रीम. मंदाकिनी मोहन म्हात्रे रामनाथ रोड, १०-९-१९४९
३)श्री.मनोहर यशवंत खराडे मु.खंडाळे, अलिबाग, १०-९-१९५२
४)श्रीम.सुवासिनी नारायण कडवे सारळ, १०-९-१९५४
५)श्रीम.प्रतिक्षा पांडुरंग पाटील चेंढरे-अलिबाग, १०-९-१९५६
६)श्रीम.दक्षता दिलीप चिकाटे पंतनगर, चेंढरे १९-९-१९६०

### कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**कै. स्वाती विनोद कार्लेकर, स्मरणार्थ अलिबाग**

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे वारे, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमीन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक संतोष मोतीराम नावरे यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले आहे सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मौजे वारे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर. पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ९१ | २१/ब | ०-११-०० | ०-०६ |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुलअखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. ०९/०९/२०२४

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**किशोर तुकाराम देशमुख**
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो.९४२२०६८७५५

दिनांक : ०९ सप्टेंबर २०२४

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकतीसंदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, बयानापावती, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे - बीडखुर्द, ता. खालापुर, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.आर.पॉ. | रुपये | पैसे |
| अजया सुरेश जाखोटिया | २३ | ३/अ | ०-३०-०० | ० | ७५ |
| | २३ | ८/अ | ०-३५-९० | ० | ५५ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

सही / -
**अल्पेश अनंत कराळे**
(ॲडव्होकेट)

कार्यालयीन पत्ता :- २०३ व २०४, दुसरा मजला, साईधाम अपार्टमेंट, हुतात्मा हिराजी पाटील चौक (अंबिका नाका),पो. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड. दिनांक :- ०९/०९/२०२४
मो. नं. ९९२२३६८१२१

## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **वरसोली, रायगड** आदर्श नगर येथे ४.५ गुंठेचे (एकूण ३६ गुंठे), ८ प्लॉट एकत्रित अथवा वेगवेगळे विकणे आहेत. अपेक्षित किंमत ₹.५५ लाख प्रत्येकी, एकत्रित ४.४ कोटी संपूर्ण चेक पेमेन्ट - ९८२२२५७९२९
- **किहीम, रायगड** समुद्रकिनाऱ्यापासून ३५० मीटर अंतरावर ३५० मिटरचा NA प्लॉट विकणे आहे. अपेक्षित किंमत ₹.९० लाख बंगल्यासाठी योग्य - ९८२२२५७९२९
- **चौल, रायगड** मुख्य रस्त्यावर, मुखरी गणपतीजवळ १८ गुंठे बागायत आणि ५५ गुंठे शेती (७३ गुंठे) जमीन एकत्रित विकणे आहे. अपेक्षित किंमत रुपये ७ कोटी - ९८२२२५७९२९
- Office staff required for Office in Alibag Fresh graduates can come for interview Call 9923750549 Between 11 am to 6 pm
- **अलिबाग एस.टी.स्टॅन्ड समोर** ‘अलिबाग प्राईड’ येथे पहिला माळा, ‘रोड फेसिंग’ सेमी कमर्शिअल फ्लॅट भाडेतत्वावर देणे/विकणे आहे. Area1000 sq.ft (2BHK Flat) Contact : 9579548535 ( स.९ ते सं.६)
- **दुकान भाड्याने मिळेल बेवुड,** गोंधळपाडा अलिबाग ९४२३३७५१९८/८४११०१६४४४
- **नागाव मधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफ** (वेटर/ हाऊसकिपींग)ची आवश्यकता आहे. एक ते दोन वर्ष अनुभव असणाऱ्यांनी रोहन ठाकूर यांना ९९२१०७४०४२ या नंबरवर संपर्क साधावा.

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल १) जितेंद्र हरिश्चंद्र पाटील, २) प्रमोद हरिश्चंद्र पाटील दोघेही रा. मु. दुंदरे, पो. मोर्बे, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६ यांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तीचे विद्यमान मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी नमुद मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मौजे - आंभेरपाडा, तालुका - कर्जत, जि. - रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| श्री हरिचंद्र नारायण ऐनकर (पाटील) | ११७ | ४ | ०.७४.०० | ०.६७ |

सदरची जमीन मिळकत ही वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून त्या विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत या तद्ंगभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्जलिन वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहित संबंध असल्यास त्यांनी ही जाहिर नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि. १०/०९/२०२४

खरेदीदारा तर्फे वकील
**ॲड. लक्ष्मण धर्मराज जाधव**
परता. मार्वल क्षिप्रा रेसीडेन्सी, शॉप नं. २४.
डी विंग, मुद्रे बुद्रक, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८१४९२११३६६/७७०९१६०५६७

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, खाली नमुद केलेली जमीन खालील जमीन मालक यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे खरेदीदारांनी विकत घेण्याचे ठरविले असुन त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

**मौजे झाप, ता.सुधागड, जि. रायगड. येथील जमीन मिळकत.**
**मिळकतीचे वर्णन :-**

| जमिन मालकाची नांवे | गट/ स.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| १) श्रीम. शारदा कोंडू जंगम<br>२) श्रीम. मंदा काशिनाथ जंगम<br>३) श्रीम. पवित्रा पांडुरंग जंगम. | १९३ | ०-६५-८० | ५-५५ |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही वहिवाट ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण बोझा, भाडेपट्टा, जप्ती, लिज, लीएन जाणे येणेचे मार्ग अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासह समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. त्याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन त्यासंबधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबध नाही व असल्यास त्यानी ते जाणीवपुर्वक सोडुन दिले आहेत, असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करून आमचे खरेदी घेणार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत बंधनकारक राहणार नाही. हे कळावे.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.
दिनांक :- १०/०९/२०२४

सही/-
खरेदीदारांचे लेखक,
राठोड एण्ड एसोसिएट्स
**श्री. सरदारमल जोरावरमल राठोड स्टॅम्प व्हेंडर,**
**श्री. राजेश एस. राठोड**
२८६अ राठोड सदन ऑफिस नं.८ पाली, ता.सुधागड, जि.रायगड.
मो. ९४२११६८७६३/९२७०३६७२९०

### जाहीर नोटिस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, आमचे मिळकतीचे वर्णनः- तुकडी व जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका उरण रायगड जिल्हा परिषद आणि पंचायत समिती उरण येथील खालील वर्णनाच्या शेतमिळकत :-

**मौजे :- जासई ता:- उरण, जि:-रायगड**

| सर्व्हे नं | शेतकऱ्यांचे नांव | एकुण क्षेत्र हे. आर. | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| २४२/३ | हरिभाऊ कुंडाजी मढवी<br>चंद्रकांत कुंडाजी मढवी | ०.२५.३० | २.४४ |

वर नमुद कलेली मिळकत ही वरील कबजेदाराच्या मालकी हक्कांत व कबजे वहिवाटीत आहे व त्यांनी सदरची मिळकत आमचे अशिलांना कायमची फरोक्त खरेदी देण्याबाबत वाटाघाट चालू आहे. सदरची मिळकत ही निर्वेध असल्याबदल विद्यमान मालकांने सांगितले आहे. सदर मिळकतीवर कोणचाही, कोणताही, कसलाही कुळ, वहिवाट, ताबाकब्जा, बयाणा पावती, वचनविठी, साठेकरार, खरेदीखत, कुळमुखत्यार पत्र, विकसीत करण्याबाबतचा करार, गहाण, बोजा, पोटगी, चार्ज, मॉर्टगेज, संपादन भाडेपट्टा, मृत्यूपत्रांकित दान, जप्ती, कर्ज, लिज तबदील, ट्रस्ट, वारसा, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणार आमचे अशिलांचे वकील यांच्याकडे आपल्या पत्त्यावर पोष्टाने अथवा प्रत्यक्ष संपर्क साधून कायदेशीर पुराव्यांसह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात.

याप्रमाणे ठरलेल्या मुदतीत हरकती न आल्यास वरील मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरून, तसेच त्या संबंधी कोणाचेही, कोणतेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत व असल्यास ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे गृहीत धरण्यात येईल. तसेच मागाहून येणारी कोणतीही हरकत अथवा परस्पर वर्तमान पत्रात घेतलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही. हे सर्वांस कळावे.

ठिकाण:- उरण
दिनांक :- २३/०८/२०२४
**ॲड. उमेश लक्ष्मण शिंदे**
मो. ९८२०६२६९००
ऑफिस पत्ता : शॉप नं. ९०५-९०८, शेल्टॉन क्युँबीक्स, प्लॉट नं-८७, सेक्टर १५, सी.बी.डी. बेलापुर, नवी मुंबई. ४००६१४.

अर्जदारांतर्फे वकील
श्री. सुरेंद्र नारायण जोशी,
नि.नं. ८/ड.

### जाहीर नोटीस

**अलिबाग येथील मे. ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, यांचे न्यायालयात,**
दिवाणी चौकशी अर्ज नं. १४३/२०२४.

१ श्रीमती श्रद्धा रोहित पाटील, )
२ कु. प्रिशा रोहित पाटील, ) ..... अर्जदार.
दोघीही रा. पेढांबे, पो. नारंगी, )
ता. अलिबाग, जि. रायगड. )
नं. १ स्वतः करीता व नं. २ तर्फे अज्ञान पालनकर्ती,
नैसर्गिक आई म्हणून.

विरूद्ध

श्रीमती आरती अशोक पाटील, )
वय - ६२ वर्षे, धंदा-गृहिणी, ) ...... सामनेवाला
रा. मु. पेढांबे, पो. हाशिवरे, )
ता. अलिबाग, जि. रायगड. )

ज्याअर्थी, अर्जदार यांनी या न्यायालयात, कै. रोहित अशोक पाटील यांस अर्जदार नं. १ व २ हेच कायदेशीर वारस आहेत, असे प्रमाणित करणेत यावे व तसा वारस दाखला अर्जदार यांचे लाभात मिळणेकरीता, या न्यायालयात इंडियन सक्सेशन ॲक्ट १९२५ चे कलम ३७२ अन्वये सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. सदर प्रकरणी अर्जदार यांचे लाभात वारस दाखला देणेस त्यांचेव्यतिरिक्त अन्य कोणाचाही कसलाही हक्क-हितसंबंध असल्यास व कोणाचीही हरकत असल्यास, संबंधितांनी नेमल्या तारखेस म्हणजे दिनांक ०८/१०/२४ रोजी या न्यायालयात ठिक सकाळी ११:०० वा. स्वतः अगर वकीलांमार्फत हजर राहून, योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह, लेखी स्वरूपात त्यांच्या हरकती दाखल कराव्यात. अशाप्रकारे कोणाचीही, कोणतीही हरकत न आल्यास अर्जदार यांचे लाभात तसा योग्य तो वारस दाखला देणेत येईल व मग मागाहून येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस मा. न्यायालयाचे आदेशाने, न्यायालयाचे शिक्क्यानिशी प्रसिद्ध केली.

अलिबाग.
तारीख: ९.०९.२०२४.

सही/-
**क. लिपीक**
**दिवाणी न्यायालय,कनिष्ठ स्तर,**
**रायगड-अलिबाग.**

सही/-
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**रायगड-अलिबाग.**

# कृषीवल गणेश दर्शन स्पर्धा २०२४



● श्री. राजाराम गजानन वार्डे, कोप्रोली-सारळ यांच्या निवासस्थानी विराजमान गणराज व केलेली सुंदर सजावट. (छाया : अब्दुल सोगावकर)



● चोंढी येथील माजी किहीम ग्रामपंचायत सदस्य श्री. सुदेश समेळ यांच्या निवासस्थानी विराजमान गणपतीचे दर्शन घेताना समेळ कुटुंबियांच्या सोबत किहीम सरपंच पिंट्या गायकवाड (छाया : अब्दुल सोगावकर)



● मानस महेंद्र भोसले आणि आर्या उदय भोसले. रा. कुरूळ, ता. अलिबाग, जि. रायगड



● माजी आमदार स्व. मधुशेठ (पप्पा) शं. ठाकूर यांच्या अलिबाग तालुक्यातील सातिर्जे या मूळगावी असलेल्या निवासस्थानी विराजमान गणरायाचे दर्शन घेताना पिंट्या गायकवाड व उपस्थित ठाकूर कुटुंबिय. (छाया : अब्दुल सोगावकर)



● श्री. चंद्रकांत परशुराम पाटील, श्री. प्रदीप परशुराम पाटील, श्री. गणेश परशुराम पाटील, मु.पो. कामार्ले, ता. अलिबाग यांच्या कुटुंबातील स्थानापन्न गणराज. (छाया : अब्दुल सोगावकर)



● योगेश शिंदे सुधागड नांदगाव इको फ्रेंडली सजावट सह्याद्रीच्या पर्वत रांगांमध्ये वाहणारे धबधबे. (छाया : भुषण सुतार)



● सुधीर मोरेश्वर देशमुख मु. तिघर, ता. कर्जत, बैलगाडा सजावट. (छाया : अनिल गवळे)




● रोशन दत्ताराम चव्हाण श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक, महाड.



● माणगाव येथील नगरसेवक अजित चंद्रकांत तारलेकर यांच्या निवासस्थानी स्थानापन्न करण्यात आलेले गणराय. (छाया : सलिम शेख)



● माणगाव येथील सामाजिक कार्यकर्त्या सुवर्णा जाधव यांच्या निवासस्थानी स्थानापन्न करण्यात आलेले गणराय. (छाया : सलीम शेख)



● दिलीप रामचंद्र मोंढे, मु. मुनवली, ता. अलिबाग यांच्या निवासस्थानी विराजमान गणराय. (छाया : अब्दुल सोगावकर)



● माथेरानमध्ये स्वप्निल कळंबे यांच्या घरी वीर हुतात्मा भाई कोतवाल यांचा जीवनपट देखावा सादर करण्यात आला आहे. (छाया : मुकुंद रांजणे)



● अलिबाग तालुक्यातील श्री. बाका पोईलकर सहाणगोठी ह्यांच्या घरी ८ फूट उंचीची गणेशमूर्ती.

# उरण तालुका बिहार होण्याच्या मार्गावर

## नागरिकांची पोलिसांवर प्रचंड नाराजी

। उरण । वार्ताहर ।

काही महिन्यांपासून उरण पोलीस ठाण्यातील तीन वरिष्ठ पोलीस निरीक्षकांची तडकाफडकी बदली करण्यात आली होती. यातच काही दिवसांपूर्वी द्रोणागिरी नोडमध्ये भीषण अपघाताची घटना घडली होती. याबाबत कोणताही गुन्हा अथवा कारवाई अद्याप झालेली दिसत नाही. उलट ज्यांच्या मुलीच्या हातून हा गुन्हा घडला त्या एका नामांकित शाळेच्या प्रिन्सिपल आहेत. आणि त्यांनी आयोजित केलेल्या शाळेच्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उरणचे नवनिर्वाचित वपोनि जितेंद्र मिसाळ यांच्या हस्ते कार्यक्रम संपन्न झाला. त्यांच्या सत्कारप्रसंगी



प्रिन्सिपल तसेच शाळेचे कमिटी मेंबरही उपस्थित होते. यामुळे, पोलीस खात्याची प्रतिमा मलिन होताना दिसत आहे. यामुळे उरणचा बिहार होण्याच्या मार्गावर असल्याने संतापाची लाट पसरली आहे.

उरण रेल्वे स्थानकाबाहेर झालेले 'हिट अँड रन' प्रकरण ताजे असताना पुन्हा एकदा असाच प्रकार उरण-द्रोणगिरी नोड येथे घडला आहे. देवकृपा चौक येथे एका भरधाव होंडा सिटी गाडीने ४ ते ५ जणांना उडवल्याची धक्कादायक घटना २४ ऑगस्ट रोजी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास घडली होती. या अपघाताचे सीसीटीव्ही फुटेज समोर आल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला होता. या अपघातात एक व्यक्ती गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. अपघातानंतर ही गाडी एका सोसायटीच्या पार्किंगमध्ये पार्क करून कव्हर टाकून ठेवली असल्याचे आढळून आले होते. या प्रकरणाचा पुढील तपास उरण पोलिस करीत असून अद्याप कोणावरही गुन्हा दाखल नसून अपघातग्रस्त वाहनही ताब्यात घेतलेले नाही.

याबाबत उरण पोलिसांकडे विचारणा केली असता कारवाई सुरू असल्याचे थातुरमातुर उत्तरे दिली जात आहेत. प्रत्यक्षात कोणती कारवाई व गुन्हा दाखल केल्याची कोणतीही माहिती दिली जात नाही. यामुळे पोलीस गुन्हेगारांना पाठीशी घालण्याचा प्रयत्न करीत असल्याचे उघड होत आहे.

# सुपेगांव रस्त्याला झाडाझुडपांचा विळखा

। कोर्लई । वार्ताहर ।

मुरुड-रोहा प्रवासात जवळचा मार्ग असलेल्या सुपेगांव रस्त्यालगत अनेक ठिकाणी असलेला झाडाझुडपांचा विळखा अपघाताला आमंत्रण ठरत आहे. याकडे संबंधित बांधकाम खात्याचे दुर्लक्ष असल्याबाबत पर्यटक, प्रवासी, वाहनचालक व नागरिकांतून नाराजी व्यक्त होत असून साईडपट्ट्या साफ करण्याची मागणी देखील केली जात आहे. तसेच, अपघातानंतरच संबंधित बांधकाम खात्याला जाग येणार का, असा संतप्त सवाल प्रवासी व वाहनचालकांकडून विचारला जात आहे. तालुक्यातील काशिद समुद्रकिनारा, फणसाड अभयारण्य तसेच मुरुड-जंजिरा किल्ला पाहाण्यासाठी रत्नागिरी, पुणे, कोल्हापूर व अन्य ठिकाणाहून पर्यटक येत असतात. रोहा-सुपेगांव मार्गे मुरुड रस्ता जवळ असल्याने या रस्त्यावर वाहनांची वाढती वर्दळ असते. मागील महिन्यापासून या रस्त्यालगत बऱ्याच ठिकाणी झाडाझुडपांचा विळखा असून काही ठिकाणी रस्त्यावर झाडे झुकलेल्या अवस्थेत आहेत. तर, काही फांद्या अवजड वाहनांना लागून तुटून अक्षरशः लोंबकळत आहेत. काही वळणांवर समोरून येणारे वाहन दिसत नसल्याने वेळप्रसंगी अपघाताची शक्यता नाकारता येत नाही.

# माथेरानमधील माकडांना विचित्र आजार

। नेरळ । प्रतिनिधी ।

मागील काही दिवसांपासून माथेरान मधील घनदाट जंगलात असलेल्या आठ ते दहा माकडांना वेगळाच आजार जडला असल्याचे दिसून आले आहे. माकडाच्या पाठीमागील बाजूस त्याच्या शरीरातील काही इंद्रियांची मोठी वाढ झाली असल्याने ती इंद्रिये शरीराच्या बाहेर जमिनीकडे झुकू लागली असल्याचे आढळून आले आहे. शहरात आणि जंगलात अशी माकडे दिसून येत असून पर्यावरणप्रेमी राकेश कोकळे यांनी याबाबत वन विभागाला माहिती दिली आहे.



वन विभागाचे वनपाल राजवर्धन आडे यांनी जंगलात फिरून अशा माकडांची पाहणी केली आहे. तसेच, असा आजार जडलेल्या माकडांची माहिती वन अधिकारी यांनी पशू संवर्धन अधिकारी डॉ. चव्हाण यांना दिली आहे.

येथील माकडांचे खाणे हे प्रामुख्याने जंगलातील झाडांची फळे असते. मात्र, माथेरानमध्ये पर्यटनासाठी आलेले पर्यटक सोबत आणलेले खाद्य पदार्थ येथील माकडांना खाण्यासाठी टाकत असतात. तर, काही माकडे पर्यटकांच्या हातातून शीतपेय पासून खाण्याचे पदार्थ हिसकावून नेत असल्याने माकडांच्या खाण्यात पुर्णपणे बदल झालेला आहे. यामुळे माकडांना विविध प्रकारचे आजार जडू शकतात, असा अभ्यास पर्यावरणप्रेमी राजेश कोकले यांनी केला आहे. तसेच, बिस्किटे खाऊन माकडांच्या अंगावरील केस निघून जात असल्याचा निष्कर्ष कोकळे यांनी काढला असून याबाबतचा अभ्यास करण्याची सूचना पशुसंवर्धन अधिकाऱ्यांना केली आहे.

# अजित हरवडे यांचा सत्कार



। सोगाव । वार्ताहर ।

माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीचे औचित्य साधून गुरुवारी (दि.५) मुनवली येथील हनुमान मंदिरात ग्रामस्थ आणि जय हनुमान मित्र मंडळातर्फे रायगड जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार २०२४ चे मानकरी अजित सिताराम हरवडे यांचा जाहीर सत्कार सोहळा संपन्न झाला. यावेळी श्री क्लासेस चोंढीचे संस्थापक संतोष राऊत यांसह वसीम कुर, जगदीश सावंत, प्रभाकर मोहिते, जगदीश बारे, सुनील अनमाने, सुधाकर मल्हार, दिलीप मोंढे, अशोक मसूरकर, राकेश पवार, सलमान कुर, माहिद कुर, साहिल शिरगावकर, रमीज कुर, अदू भगत, प्रशांत सकरे आदी मान्यवर तसेच ग्रामस्थ, महिलावर्ग आणि मंडळाचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)